दैनिक
# लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, नवी मुंबई, पुणे, रायगड, नाशिक, सातारा, कोल्हापूर

वर्ष ०३ | अंक २१९ | पृष्ठे ०८ | रू. २/-

RNI. REG. NO. MAHBIL/2023/86118
लोकरक्षणाय — लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com | epaper.lokrakshanay.com | ठाणे, दिनांक बुधवार, ०३ डिसेंबर २०२५

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ | dainiklokrakshanay@gmail.com | +91 97023 86118 | 022 - 6971 1890




ग्रामीण भागातील जलस्रोतांची सुरक्षा आणि शाश्वतता दृढ करण्यासाठी जिल्हा...
पान ३ वर


विशेष लेख

आंतरराष्ट्रीय अपंग व्यक्ती दिनाचे समाजशास्त्रीय...
पान ४ वर

**सुविचार**

"स्वतःच्या नशिबावर विश्वास ठेवण्यापेक्षा स्वतःच्या मजबुतीवर विश्वास ठेवा."
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर

घोडबंदर रोडवरील ट्रॅफिकची समस्या कधी संपणार?; ठाण्यात वर्षभरात खड्ड्यांमुळे...
पान ८ वर



विशेष उपक्रम

वाचकांसाठी खास उपक्रम - ध्यास+ (ध्यास सकारात्मकतेचा)
पान ५ वर

ध्यास सकारात्मकतेचा

## () थोडक्यात ()

### सक्रिय सिमवरच व्हॉट्सॲप चालणार

नवी दिल्ली : व्हॉट्सॲपसारख्या मेसेजिंग ॲपना फक्त सक्रिय सिमसह काम करण्याची सक्ती दूरसंचार विभागाच्या निर्णयामुळे राष्ट्रीय सुरक्षा मजबूत होईल, असे दूरसंचार उद्योग संघटना सीओएआयने म्हटले आहे. अशा सलग जोडणीमुळे सिम कार्ड आणि त्याच्याशी संबंधित कम्युनिकेशन ॲपद्वारे केलेल्या कोणत्याही क्रियाकलापांसाठी जबाबदारी आणि ट्रेसेबिलिटी सुनिश्चित होते, अज्ञातता आणि गैरवापर करण्यास सक्षम असलेल्या दीर्घकालीन अंतरांना दूर करते, संघटनेने म्हटले आहे.

### शिष्यवृत्ती परीक्षा ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यास ८ डिसेंबरपर्यंत दिली मुदतवाढ

मुंबई : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत २२ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित शिष्यवृत्ती परीक्षेसाठी ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याकरिता ८ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती परीक्षा परिषदेमार्फत देण्यात आली आहे.महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता पाचवी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता आठवी) दि. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी सर्व जिल्ह्यांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षेकरिता शाळा नोंदणी व विद्यार्थी ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याकरिता ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र आता ८ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.ज्या शाळांनी अद्याप ऑनलाईन आवेदनपत्र भरले नसतील त्यांनी नियमित शुल्कासह ८ डिसेंबरपर्यंत शाळा माहिती प्रपत्र, आवेदनपत्र आणि शुल्क ऑनलाईन भरावयाचे आहे.

# सर्व निकाल २१ डिसेंबरला

## मतमोजणीच्या निर्णयावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नाराज

● मुंबई, राकेश गायकवाड :



महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये काल (२ डिसेंबर) २६४ नगरपरिषद व नगरपंचायतींसाठी निवडणुका पार पडली. अशातच, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या मतमोजणीबाबत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. सर्व नगरपालिका व नगरपंचायत निवडणुकीचा निकाल २१ डिसेंबर रोजी एकत्र जाहीर करण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला आहे. "पहिल्यांदाच असं घडतंय" असे म्हणत या संपूर्ण प्रक्रियेवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

**२० डिसेंबरपर्यंत आचारसंहिता कायम**

काही ठिकाणी मतदान आधी पार पडले असले, तरीही निकाल घोषित करण्याची तारीख बदलता येणार नाही, असे कोर्टाने नमूद केले आहे. यासोबतच २० डिसेंबरपर्यंत आचारसंहिता कायम राहिल, असेही कोर्टाने स्पष्ट केले असून तोपर्यंत एक्झिट पोल प्रसिद्ध करण्यासही बंदी असणार आहे.

**...पण असं पहिल्यांदा घडलं**

न्यायालयाच्या या निर्णयावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, "हा निर्णय खंडपीठाने दिला आहे, तर तो सगळ्यांना मान्यच करावा लागेल. मी मागील २५ ते ३० वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पाहत आलो आहे. पण असं पहिल्यांदा घडत आहे की, घोषित केलेल्या निवडणुका पुढे ढकलल्या जात आहेत. त्याचे निकाल पुढे चालले आहेत. ही जी काही पद्धत आहे ती योग्य वाटत नाही", असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाराजी व्यक्त केली.

**निवडणूक आयोगामुळे सर्वांचा भ्रमनिरास**

पुढे ते म्हणाले, "माझी नाराजी निवडणूक आयोगावर नाही, तर संपूर्ण प्रक्रियेत दिसलेल्या उणिवांवर आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये अशी अव्यवस्था निर्माण झाली आहे. या निर्णयामुळे मेहनत करणारे उमेदवार, प्रचार करणारे कार्यकर्ते यांचा भ्रमनिरास होतो. यंत्रणेच्या चुकांमुळे अशा गोष्टी घडणे योग्य नाही".

**संपूर्ण प्रक्रियेत आयोगाने सुधारणा करणे अत्यावश्यक**

पान २ वर

## कुंभमेळ्याचे पावित्र्य टिकवून विकासासोबत वारशाचेही जतन करणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

● मुंबई, विशाल कारंडे :



दक्षिण गंगा असलेल्या गोदावरीच्या स्वच्छतेसाठी नागरिक आणि गुंतवणूकदारांनी दिलेला उत्स्फूर्त सहभाग अत्यंत कौतुकास्पद आहे. 'विकास भी, विरासत भी' हा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा संदेश मार्गदर्शक असून कुंभमेळ्याचे पावित्र्य टिकवून विकासासोबत ऐतिहासिक वारशाचेही जतन करण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

नॅशनल स्टॉक एक्सचेंज, मुंबई येथे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते नाशिक महापालिकेचा 'क्लीन गोदावरी बॉण्ड' समारंभपूर्वक सूचीबद्ध करण्यात आला. या कार्यक्रमास मुख्य सचिव राजेश अग्रवाल, नगरविकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. के.एच. गोविंदराज, नॅशनल स्टॉक एक्सचेंजचे व्यवस्थापकीय संचालक आशिष चौहान, 'मित्रा' चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, नाशिक महानगरपालिका आयुक्त मनिषा खत्री उपस्थित होते.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नाशिक परिसरात कुंभमेळयासाठी विविध विकासकामे होत आहेत. राज्य शासनाने नगरविकास विभागामार्फत कुंभमेळ्यापूर्वी आवश्यक असलेली अनेक पायाभूत कामे हाती घेतली आहेत. कुंभमेळ्याचे पावित्र्य कायम राखत विकास पुढे नेला जाईल. यासाठी अनेक योजना तयार केल्या असून त्या कार्यान्वित करण्यात येत आहेत.

पान २ वर

## कोकणात सहलीला गेलेल्या नाशिकच्या विद्यार्थ्यांची बस पुलावरून कोसळली

### ४२ विद्यार्थी जखमी, चारजण गंभीर

● सातारा, दिगंबर जाधव :



कोकणात सहलीसाठी गेलेल्या नाशिकमधील विद्यार्थ्यांच्या बसला अपघात झाला आहे. या अपघातात ४२ हून अधिक विद्यार्थी जखमी झाल्याची माहिती आहे. विद्यार्थ्यांची बस कोकणातून मंगळवारी परत नाशिकला येत असताना पुणे-बंगळूरू महामार्गावर हा अपघात झाला. कराड तालुक्यातील वाठार गावच्या हद्दीत विद्यार्थ्यांची बस पुलावरून खाली कोसळली. जखमी ४२ विद्यार्थ्यांपैकी चारजण गंभीर असल्याचं सांगण्यात येत आहे.

**रस्त्याचा अंदाज न आल्यानं बस पुलावरून कोसळली :** नाशिकच्या निफाडमधील बी.पी. महाविद्यालयाचे विद्यार्थी सहलीसाठी कोकणात गेले होते. कोकणातून सातारामार्गे नाशिकला परतत असताना पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर मंगळवारी पहाटे या बसचा अपघात झाला. वाठार (ता. कराड) गावच्या हद्दीत पुलाचं काम सुरू आहे. पहाटे अंधार असल्यानं बस चालकाला रस्त्याच्या परिस्थितीचा अंदाज आला नाही. अशा स्थितीत बस भराव पुलावरून खाली कोसळली. या अपघाताची माहिती मिळताच विद्यार्थ्यांचे पालक भयभीत झाले होते. अपघाताची माहिती घेण्यासाठी ते कराड पोलिसांशी संपर्क साधत होते.

**चार विद्यार्थी गंभीर :** या अपघातात बस मधील ४२ हून अधिक विद्यार्थी जखमी झाले आहेत. त्यातील चार विद्यार्थी गंभीररित्या जखमी असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. सर्व जखमी विद्यार्थ्यांना कराडच्या कृष्णा रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघाताची माहिती मिळताच कराड ग्रामीण आणि महामार्ग मदत केंद्राच्या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. वाठार गावच्या ग्रामस्थांनींनीदेखील पोलिसांना मदत केली.

**जखमींवर उपचार सुरू :** जखमी विद्यार्थांमधील १० जणांवर कराडच्या वेणूताई चव्हाण उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

पान २ वर

## नवले ब्रिज दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय महामार्गावर तात्काळ पाच उपाययोजना कराव्यात – उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

● पुणे, शकील शेख :



मुंबई–बेंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील नवले ब्रिज परिसरात वारंवार होणाऱ्या अपघातांची गंभीर दखल घेत विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज विभागीय आयुक्त कार्यालयात तातडीची आढावा बैठक घेतली. सदर महामार्गावरील वाहतूक सुरक्षिततेसाठी, नवा रिंगरोड प्रकल्प पूर्ण होईपर्यंत प्रशासकीय यंत्रणेने तत्काळ राबवावयाच्या पाच महत्त्वपूर्ण उपाययोजना घोषीत कराव्यात, अशा ठोस सूचना त्यांनी बैठकीत केल्या.

या बैठकीला जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे विभागीय उपायुक्त तुषार ठोंबरे, पुणे अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, विभागीय उपायुक्त तुषार ठोंबरे, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प अधिकारी संजय कदम, पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिकांचे वरिष्ठ अभियंते, वाहतूक पोलीस, तसेच संबंधित विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान २ वर

## मुंबई पुण्यासह राज्यात यंदा हुडहुडी वाढणार;! तापमानातील पारा घसरला, थंडीच्या लाटेचा इशारा

● मुंबई, विशाल पाटील :



बंगालच्या उपसागरातील वादळाचा परिणाम ओसरला असून, राज्यात आता हुडहुडी भरविणारी थंडी पुन्हा परतली आहे. मराठवाडा तसेच मध्य महाराष्ट्रात थंडीची लाट पसरली असून, सोमवारी सोलापूर जिल्ह्यातील जेऊर येथे सर्वात कमी ९ अंश सेल्सिअस तापमान नोंदविण्यात आले. पालघर, नवी मुंबई, ठाणे येथे रात्रीच्या वेळी चांगलाच गारठा जाणवत असून मुंबईतही पारा घसरणार आहे. पुढील दोन ते तीन दिवस तापमानातील ही घट कायम राहणार असल्याचेही हवामान विभागाने अंदाजात म्हटले आहे.

**थंडीच्या लाटेचा इशारा**

मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात आज (दि.२) थंडीच्या लाटेचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. पुणे, अहिल्यानगर, जळगाव, नाशिक, धुळे, नंदुरबार आदी जिल्ह्यात थंडीची लाट पसरली असून, ती मंगळवारीदेखील कायम राहणार आहे.

पान २ वर

## बिबट्याच्या दहशतीच्या वातावरणातही मतदारांमध्ये मतदानाचा उत्साह

● पुणे, सुचिता देशमुख :



राज्यातील २६४ नगरपरिषदा आणिनगरपंचायतींच्यासार्वत्रिक निवडणुकांसाठी आज मतदान होत आहे. उत्तर पुण्यातल्या निवडणूक प्रचारादरम्यान दिसलेलं बिबट्याचं सावट आता प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशीही परिणाम करू शकेल असं वाटत असतानाच मतदारांनी उत्साह दाखवला आहे. गेल्या काही दिवसांपासून बिबट्या वेगवेगळ्या ठिकाणी फिरताना आढळल्यामुळं परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण आहे. या भीतीनं प्रचारावर जसा परिणाम झाला, तसाच परिणाम मतदानावरही होण्याची शक्यता वर्तवली जात होती.

**मतदानाच्या दिवशी थेट परिणाम होणार का?:** प्रचारादरम्यान उमेदवारांना संध्याकाळी मतदारांपर्यंत पोहोचण्यात मोठं आव्हान उभं राहिलं होतं. अंधार पडण्यापूर्वी प्रचार आटपावा लागल्यानं अनेक सभा रद्द कराव्या लागल्या किंवा वेळ बदलावी लागली. एवढंच नव्हं तर अजित पवार आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांसारख्या दिग्गज नेत्यांनीही गर्दी कमी होऊ नये म्हणून दिवसाच्या वेळेत सभा घेण्याचा निर्णय घेतला. हे चित्र परिसरातील भीतीचं गांभीर्य स्पष्ट करतंय. आजच्या मतदानाच्या दिवशी या परिस्थितीचा थेट परिणाम दिसू शकतो. पहाटे आणि सकाळच्या सत्रात बिबट्या शिकारीसाठी अधिक सक्रिय असतो, असा वनविभागाचा अंदाज असल्यानं अनेक मतदार घराबाहेर पडण्यास घाबरू शकतात.

'मतदानाला जाताना बिबट्या अचानक समोर आला तर?' अशी भीती अनेकांच्या मनात घर करून आहे.

विशेषतः वयोवृद्ध आणि एकटे राहणाऱ्या नागरिकांमध्ये ही चिंता अधिक दिसते.

पान २ वर

## "संचार साथी ॲपची सक्ती म्हणजे देशाला हुकूमशाहीकडे घेऊन जाण्याचा प्रयत्न"; काँग्रेसचा हल्लाबोल

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :






देशभरात सायबर फसवणुकीच्या अनेक घटना समोर येत असताना केंद्र सरकारने डिजिटल सुरक्षेसाठी मोठा निर्णय घेतला आहे. दूरसंचार विभागाने (DOT) सर्व स्मार्टफोन उत्पादक कंपन्यांना राज्य सरकारद्वारे विकसित करण्यात आलेले सायबर सिक्युरिटी 'संचार साथी' हे ॲप प्रत्येक डिव्हाइसमध्ये प्री-इन्स्टॉल करण्याचे निर्देश सोमवारी (दि.१) दिले.

'संचार साथी' या ॲपमुळे फसवणुकीचे कॉल-मेसेज, तसेच हरवलेले किंवा चोरीला गेलेले मोबाईल यांची माहिती नागरिकांना त्वरित नोंदवता येणार आहे. सरकारच्या या निर्णयावर आता विरोधकांनी आक्षेप घेतला आहे. काँग्रेसच्या सरचिटणीस आणि खासदार प्रियंका गांधी यांनी "संचार साथी ॲपची सक्ती म्हणजे देशाला हुकूमशाहीकडे घेऊन जाण्याचा प्रयत्न" असे म्हणत या निर्णयाला आज (दि.२) विरोध केला आहे.

**थेट पाळत ठेवण्याचे साधन**

खासदार प्रियंका गांधी म्हणाल्या, "संचार साथी हे ॲप म्हणजे थेट पाळत ठेवण्याचे साधन आहे आणि हे अगदीच हास्यास्पद आहे. प्रत्येक नागरिकाला गोपनीयतेचा हक्क आहे. कुटुंबीयांना, मित्रांना मेसेज करण्यासाठी सरकारने प्रत्येक गोष्ट पाहावी, हा विचारही चुकीचा आहे."

**..तर देशाला मार्गाने हुकूमशाहीकडे घेऊन जाण्याचा प्रयत्न**

पुढे त्या म्हणाल्या, "ही फक्त फोनवरची पाळत नाही तर देशाला मार्गाने हुकूमशाहीकडे घेऊन जाण्याचा प्रयत्न आहे. संसद चालत नाही कारण सरकार कोणत्याही विषयावर चर्चा करण्यास नकार देत आहे. विरोधी पक्षाला दोष देणे सोपे आहे, पण चर्चा टाळली जाते. ही लोकशाही नाही. लोकशाहीत चर्चा आवश्यक असते. मतभेद असतात, ते ऐकले जातात."

पान २ वर

## संपादकीय

### शस्त्रास्त्रविक्रीची धूर्त खेळी

अमेरिकेच्या अलिकडच्या एका अहवालानुसार, चीनने पाकिस्तानच्या सहकायनि या संघर्षाचे रूपांतर त्यांच्या शस्त्रांच्या युद्धभूमी चाचणीत केले. त्यानंतर त्यांनी मुस्लिम देशांना शस्त्रे विकण्यासाठी या चाचणी निकालांचे अतिरंजित वर्णन केले. अहवालात म्हटले आहे, की चीनने केवळ जमिनीवरच आपल्या शस्त्रांची चाचणी केली नाही, तर पाश्चात्य देशांविरुद्ध शस्त्रास्त्रांचा बाजार मजबूत करण्यासाठी जगभरात आक्रमकपणे त्यांचा प्रचार केला. मे २०२५ च्या संघर्षादरम्यान, चीनच्या अनेक प्रगत शस्त्रांचा वापर प्रत्यक्ष युद्धात पहिल्यांदाच करण्यात आला. यामध्ये एचक्यू९ हवाई संरक्षण प्रणाली, पीएल-१५ हवेतून हवेत मारा करणारे क्षेपणास्त्र आणि जे-१०सी लढाऊ विमान यांचा समावेश आहे. भारतासमोर चीनची अनेक शस्त्रे निष्प्रभ ठरली; परंतु त्याची जगभर चर्चा होऊ नये, म्हणून आपली शस्त्रास्त्रे किती परिणाम कारक ठरली, याचा आक्रमक प्रचार करून चीनने शस्त्रास्त्रांची जागतिक बाजारपेठ मजबूत करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी पाकिस्तानचा उपयोग करून घेतला. पाकिस्तानने मुस्लिम राष्ट्रांचे मत परिवर्तन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. पाकिस्तान-भारत संघर्षावेळी चीनची आधुनिक शस्त्रे सक्रिय लढाईत तैनात करण्याची ही पहिलीच वेळ होती आणि चीनने संपूर्ण संघर्षाचा वापर एक प्रकारचा 'फील्ड एक्सपिरीमेंट' म्हणून केला. अहवालानुसार, चीनने पाश्चात्य शस्त्रांविरुद्ध आपल्या उत्पादनांची विक्री करण्यासाठी पाकिस्तानच्या लष्करी यशाचा फायदा घेतला. पाकिस्तानचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्रमंत्री इशाक दार यांनी संसदेत दावा केला, की पाकिस्तानी जे-१० सी विमानांनी राफेलसह भारतीय हवाई दलाची अनेक विमाने पाडली. चीनी दूतावासांनी जगभरात शस्त्रास्त्र विक्री वाढवण्यासाठी हे दावे केले. चीनने 'सोशल मीडिया'वरील बनावट खात्यांद्वारे 'एआय' व्युत्पन्न प्रतिमा आणि व्हिडीओ-गेम ग्राफिक्स भारतीय विमानांचे अवशेष म्हणून प्रसारित केले. फ्रेंच राफेलची प्रतिमा खराब करण्यासाठी आणि स्वतः च्या जे-३५ लढाऊ विमानांचा प्रचार करण्यासाठी याचा वापर करण्यात आला होता. फ्रेंच गुप्तचर यंत्रणेचा हवाला देत, अहवालात दावा केला गेला, की चीनच्या प्रचार मोहिमेनंतर इंडोनेशियाने राफेल खरेदी प्रक्रिया थांबवली. अहवालात म्हटले आहे, की पाकिस्तान चीनी शस्त्रांवर खूप अवलंबून आहे. जूनमध्ये चीनने पाकिस्तानला ४० जे-३५ लढाऊ विमाने, केजे-५०० आणि बॅलिस्टिक क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली विकण्याची ऑफर दिली. 'स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूट'च्या मते, गेल्या पाच वर्षांमध्ये पाकिस्तानच्या शस्त्रास्त्र आयातीपैकी ८१ टक्के शस्त्रे चीनमधून आली आहेत. जागतिक शस्त्रास्त्र बाजारपेठेत एक प्रमुख खेळाडू म्हणून चीनचा उदय 'पीपल्स लिबरेशन आर्मी' (पीएलए) च्या क्षमता वाढवण्याच्या प्रेरणेने झाला. परिणामी, त्यांनी त्यांच्या संरक्षण उद्योगात सुधारणा केल्या आहेत आणि त्यांची संरक्षण उपकरणे सुधारण्यासाठी लष्करी खर्च सातत्याने वाढवला आहे. शस्त्रास्त्र बाजारपेठेतील चीनची भूमिकादेखील बदलत्या सुरक्षा वातावरणाची जाणीव करून देते. २०१२ ते २०१६ दरम्यान जागतिक शस्त्रास्त्रनिर्यातीत चीनचा वाटा ३.८ टक्क्यांवरून ६.२ टक्क्यांपर्यंत वाढला. २०१६-२०२० या काळात तो ५.२ टक्क्यांपर्यंत घसरला असला, तरी चीन जगातील पाचव्या क्रमांकाचा शस्त्रास्त्र निर्यातदार राहिला आहे. अमेरिका आणि रशियाच्या तुलनेत त्याचा वाटा माफक असला, तरी नवीन तंत्रज्ञानासह नवीन बाजारपेठेत प्रवेश करण्यास सज्ज आहे. 'सेंटर फॉर नेव्हल ॲनॅलिसिस'च्या विश्लेषणानुसार चीनने शस्त्रास्त्रनिर्यातीत एक स्थान निर्माण केले आहे. चीन आघाडीवर असणारे आणखी एक क्षेत्र म्हणजे सशस्त्र ड्रोन. (ज्याला मानवरहित हवाई वाहने, यूएव्ही असेही म्हणतात). २०१८ पर्यंत चीनने जगभरातील दहाहून अधिक देशांना जड आणि सशस्त्र यूएव्हीज निर्यात केले होते. चीनने पाकिस्तानी हवाई दलासह संयुक्तपणे चीनी विंग लूंग २ ड्रोन तयार करण्यास सहमती दर्शविली आहे. २०१३ च्या 'एसआयपीआरआय' अहवालानुसार चीन लहान शस्त्रे आणि हलक्या शस्त्रांचादेखील एक प्रमुख निर्यातदार आहे. चीन शस्त्रास्त्रे खरेदी करणाऱ्या देशांना लवचिक 'पेमेंट स्ट्रक्चर्स देखील ऑफर करतो. ते विकसनशील देशांसाठी आकर्षक आहे. शिवाय लष्करी उपकरणांच्या स्त्रोतांमध्ये विविधता आणू इच्छिणाऱ्या देशांनाही चीनी शस्त्रे चांगली वाटतात. चीनी उपकरणांची गुणवत्ता आणि टिकाऊपणाबद्दल साशंकता असली, तरी पैसे, सवलती आणि संबंधित देशांमधील राज्यकर्त्यांना लाच देऊन खरेदी करणे भाग पाडले जाते.

\- अनिकेत घनश्याम भंकाळ

## आजची चित्रोळी



सौख्यानें हें नव्हे विहरणें
धडपड अन्न शोधाची !
सहज सोपें दिसलें तरीहि
असते खूप कष्टाची !!

मुकुंद कुलकर्णी

# महापरिनिर्वाण दिनासाठी सुरक्षेसह सेवासुविधांची काटेकोर अंमलबजावणी करा – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## इंदू मिल येथील पुतळ्यासंदर्भात समन्वय समिती स्थापन करण्यात येणार



**मुंबई (विशाल कारंडे) :** देशभरातून महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी चैत्यभूमी परिसर तसेच मुंबईत लाखोंच्या संख्येने अनुयायी येतात. येणाऱ्या अनुयायांची सुरक्षितता आणि सोयीसुविधांसाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे. चैत्यभूमी येथे उभारल्या जाणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासंदर्भात विविध सूचना प्राप्त झाल्या असून याबाबत समन्वय समिती स्थापन करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाला ज्ञान दिले आणि जागरूक केले. या जागरूकतेला अधिक बळकटी देण्याचा तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार पुढे नेण्याचा प्रयत्न महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने आपण सर्वजण करूया, असेही आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पूर्वतयारीच्या अनुषंगाने मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज सह्याद्री अतिथीगृह येथे आढावा बैठक झाली. या बैठकीस सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ, माजी मंत्री विजय गिरकर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, बेस्ट'च्या महाव्यवस्थापक सोनिया सेठी, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल गोयल, तसेच विविध विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे यांच्यासह विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, चैत्यभूमी परिसरात योग्य मंडप व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सोय, तसेच इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. दादर व आसपासच्या परिसरात वाहतूक पोलीस यंत्रणांनी रहदारीचे योग्य नियोजन आणि नियंत्रण करावे. अनुयायांना मार्गदर्शन मिळावे यासाठी जागोजागी सूचनाफलक लावावेत. तसेच, नागरिकांना सुलभ प्रवासासाठी बेस्टतर्फे अतिरिक्त बससेवा उपलब्ध ठेवावी. या बैठकीच्या निमित्ताने अनेक चांगल्या व उपयुक्त सूचना प्राप्त होतात. यामुळे मूलभूत बाबींवर लक्ष देत दरवर्षी अधिक चांगले काम करता येते, तसेच काही उणीवा राहिल्या असतील तर त्या दूर करण्याचा प्रयत्न करता येतो. उत्तम नियोजन आणि समन्वयासाठी ही बैठक आयोजित केली जात असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

बैठकीत येणाऱ्या अनुयायांची व्यवस्था, सुरक्षेची व्यवस्था, आरोग्य व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, बस सेवा, भोजन व्यवस्था, चैत्यभूमी परिसरात वॉटरप्रूफ मंडप, स्वच्छतागृहे, वाहतूक व्यवस्थेचे नियोजन, पुष्पवृष्टी, सीसीटीव्ही कॅमेरे आणि इतर सर्व सोयीसुविधा यांचा सविस्तर आढावा यावेळी घेण्यात आला.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त तयार करण्यात आलेल्या पोस्टरचे अनावरण तसेच माहिती पुस्तिकेचे प्रकाशन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

## पान १ वरून...

### सर्व निकाल २१ डिसेंबरला...

निवडणूक आयोगावर मोठ्या प्रमाणात निवडणुकांचे ओझे आहे. पण या संपूर्ण प्रक्रियेत आयोगाने सुधारणा करणे अत्यावश्यक आहे. किमान पुढील निवडणुकांमध्ये तरी अशी परिस्थिती निर्माण होणार नाही, याची खबरदारी निवडणूक आयोगाने घेतली पाहिजे", असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

**२१ डिसेंबरचा दिवस निर्णायक**

२० नगरपरिषदांमध्ये प्रलंबित न्यायप्रक्रियेमुळे मतदान उशिरा होत आहे. वेगवेगळ्या दिवशी निकाल जाहीर झाल्यास गैरसमज व गोंधळ निर्माण होऊ शकतो, अशी याचिकाकर्त्यांची भूमिका कोर्टाने मान्य केली आणि निकाल एकाच दिवशी जाहीर करण्याचे निर्देश कायम ठेवले. हायकोर्टाच्या आदेशानुसार, आता राज्यातील सर्व नगरपरिषद–नगरपंचायत निवडणुकांचे निकाल २१ डिसेंबरला एकत्रितरीत्या जाहीर होतील. अनेक दिवस अनिश्चिततेत असलेल्या उमेदवार, पक्ष आणि मतदारांसाठी हा निर्णय मोठा दिलासा देणारा ठरला आहे.

### कुंभमेळ्याचे पावित्र्य टिकवून विकासासोबत...

हे करताना, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे नाविन्यपूर्ण विचार आणि वित्तीय संकल्पनेतूनच योजना पुढे जातील.

कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकच्या पायाभूत सुविधांच्या विकासात नाशिक महानगरपालिका महत्त्वाची भूमिका बजावत आहे. नाशिक परिसरात मोठ्या प्रमाणावर विकासकामांची संधी उपलब्ध होत असून, ऐतिहासिक वारसा जपतानाच जीवनदायीनी गोदावरीच्या स्वच्छतेसाठी महत्त्वपूर्ण काम होत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

**नाशिक महानगरपालिकेला खुल्या बाजारातील गुंतवणूकदारांचा प्रचंड प्रतिसाद**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, यापूर्वी पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकांनीही खुल्या वित्तीय बाजारातून बॉण्डद्वारे निधी उभारला आहे. नाशिक महानगरपालिकेच्या 'क्लीन गोदावरी बॉण्ड'ला गुंतवणूकदारांकडून सबस्क्रिप्शनसाठी मिळालेला चौपट प्रतिसाद ही स्थानिक स्वराज्य संस्थेच्या आर्थिक सक्षमता, रेटिंग आणि पारदर्शक प्रक्रियेची पावती आहे. राज्यातील १५ महानगरपालिका अशा क्षमतेच्या असून नियमन प्रक्रियेतून विशिष्ट पात्रता आणि नियामक मान्यता पूर्ण करून या महानगरपालिकाही विकासासाठी निधी उभारू शकतात.

खुल्या बाजारातून उभारलेल्या निधीच्या आधारे केंद्र सरकारकडून पायाभूत विकासासाठी मिळणाऱ्या निधीचा मार्गही सुलभ झाला आहे.

तसेच 'एनएसई' प्रक्रियेमुळे २६ कोटी रुपये प्रोत्साहन निधी मिळणार असून याद्वारे महानगरपालिकेवरील व्याजभार शून्य टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकतो, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

**ऊर्जा क्षेत्रातील कंपन्या नॅशनल स्टॉक एक्सचेंजमध्ये सूचीबद्ध करणार**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की,"ऊर्जा क्षेत्रातील महत्त्वाच्या कंपन्यांच्या क्षमतेस चालना देण्यासाठी नॅशनल स्टॉक एक्सचेंजच्या माध्यमातून व्यापक प्रमाणात निधी उपलब्ध होईल. पहिल्या टप्प्यात महापारेषण (एमएसईटीसीएल), त्यानंतर महावितरण आणि महानिर्मिती या देशातील मोठ्या वीज कंपन्या सूचीबद्ध करण्याची प्रक्रिया सुरू केली जाईल. या प्रक्रियेसाठी नॅशनल स्टॉक एक्सचेंजच्या अनुभवाची मोठी मदत ठरेल"असेही त्यांनी स्पष्ट केले.

### कोकणात सहलीला गेलेल्या नाशिकच्या...

तर इतर ३२ जणांना कराडच्याच कृष्णा रूग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. ४ विद्यार्थी गंभीर जखमी असून त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. हे सर्व विद्यार्थी निफाडमधील बी. पी. पाटील महाविद्यालयाचे आहेत. दरम्यान, मुली देखील सहलीला गेल्या होत्या. पण त्या दुसऱ्या बसमध्ये होत्या.

### नवले ब्रिज दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर...

बैठकीत नवले ब्रिज परिसरातील अपघातांच्या पुनरावृत्तीची कारणमीमांसा, वाहतूक कोंडी, ट्रक व भारी वाहनांची अनियंत्रित गती, घाट आणि उतारातील वाहन नियंत्रण यावर सविस्तर चर्चा झाली. अनेक अपघातांमध्ये वाहनांच्या वेगावरील अपुऱ्या नियंत्रणामुळे मोठी जीवितहानी झाल्याचे लक्षात घेऊन उपसभापतींनी पुढील उपाययोजनांचा अवलंब करण्याचे आदेश दिले.

यामध्ये सर्वप्रथम, सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचनांचा आधार घेत स्पीड कमी करण्यासाठी सुसंगत रबर स्पीड ब्रेकर किंवा रंबल स्ट्रिप्स बसवण्यावर भर देता येईल. रस्ता ओला असताना वाहनांच्या घसरण्याचे प्रमाण वाढते, त्यामुळे हे स्ट्रिप्स संपूर्ण सुरक्षा मानकांनुसार बसवावेत, अशी स्पष्ट सूचना देण्यात आली.

दुसरे म्हणजे, वाहतूक कोंडी निर्माण झाल्यानंतर तातडीने परिस्थिती हाताळण्यासाठी Action Oriented Plan (AOP) तयार करण्याचे निर्देश देण्यात आले. रात्री वा पावसाळ्यात अपघात झाल्यास कोंडी वाढू न देता वाहन प्रवाह सुरळीत ठेवण्यासाठी पोलिस, महामार्ग प्राधिकरण आणि मनपांच्या पथकांमध्ये समन्वय वाढवण्याची गरजही बैठकीत व्यक्त झाली.

तिसरे म्हणजे, अपघातप्रवण झोनमध्ये मोबाइल चेकपोस्ट किंवा स्थिर चौकीची स्थापना करता येईल का याबाबत नियमांनुसार तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले. विशेषतः भारी वाहनांचे वेग नियंत्रण, ब्रेक कंडीशन, ओव्हरलोडिंग यावर नजर ठेवण्यासाठी हे केंद्र प्रभावी ठरतील, असे उपसभापतींनी सांगितले.

चौथ्या उपाययोजनेत अपघातप्रवण परिसरात ध्वनीक्षेपक (Public Address System) बसवून चालकांना सतत वेग, उतार, पावसाळी परिस्थिती आणि ट्रॅफिक अद्यतनांची माहिती देण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. हे सिस्टम महामार्ग पोलिसांच्या नियंत्रणात राहून त्वरित सूचना देऊ शकतील.

पाचव्या उपाययोजनेत जवळच फायर ब्रिगेडची सुविधा उपलब्ध ठेवणे, रेस्क्यू टीम तैनात करणे, तसेच अपघातानंतर 'गोल्डन अवर'मध्ये मदत पोहोचविण्यासाठी स्वतंत्र पथक तयार करण्याचे निर्देश दिले. याशिवाय ट्रक मालक असोसिएशनची बैठक घेऊन ड्रायव्हर ट्रेनिंग, उतारावरील गतीनियंत्रण, वाहनांची नियमित तपासणी अशा मुद्द्यांवर मार्गदर्शन करण्यासही सांगितले.

बैठकीदरम्यान उपसभापतींनी प्रशासनाला सांगितले की, नवले ब्रिज परिसरातील अपघातांची मालिका थांबवण्यासाठी जबाबदारी निश्चित करून एक आदर्श नमुना तयार करावा.प्रशासनाने या सर्व उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी करावी, येत्या २६ किंवा २७ डिसेंबर रोजी आपण या संदर्भात आढावा घेणार असल्याचे त्यापूर्वी याबाबीवरचा कार्य अहवाल ठेवावा असे निर्देश दिले.

### मुंबई पुण्यासह राज्यात यंदा...

या जिल्ह्यातील अनेक शहरात थंडीचा प्रभाव वाढला असून, ९ ते १० अंश सेल्सिअस दरम्यान किमान तापमान आले आहे.

बंगालच्या उपसागरातील दितवाह वादळाची तीव्रता कमी होऊन सोमवारी त्याचे न्यून दाबात रूपांतर झाले आहे. हे क्षेत्र उत्तर तमिळनाडू, दक्षिण आंध्र किनारपट्टीला समांतर समुद्रातच उत्तरेच्या दिशेने प्रवास करत आहे. याची तीव्रता पुढे आणखी कमी होणार आहे. दरम्यान, बंगालच्या उपसागरात लागोपाठ निर्माण झालेल्या दोन वादळांमुळे राज्यात उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांना अडथळा निर्माण झाला होता. मात्र आता उत्तरी वाऱ्यांचा प्रभाव वाढल्याने राज्यात गेल्या दोन दिवसांपासून थंडीचा प्रभाव वाढला आहे.

मध्य महाराष्ट्र तसेच मराठवाड्यातील अनेक भागाचा किमान तापमानाचा पारा १० अंश सेल्सिअसच्या आसपास पोहचला आहे. बोचरे थंड वारे सायंकाळी आणि पहाटेच्या सुमारास जाणवत असून, दिवसादेखील गारवा जाणवत आहे. किमान तापमानात २ ते ३ अंश सेल्सिअसपर्यंत घट होण्याची शक्यता आहे. मात्र, पुढील २४ तास वातावरण स्थिर राहील. त्यानंतरच्या चार दिवसांमध्ये थंडीचा जोर २ ते ३ अंश सेल्सिअसने कमी होऊ शकतो, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

**वायव्य भारतात थंडीची लाट**

पंजाब, हरियाणा आणि दिल्लीच्या भागात सोमवारी थंडीची लाट पसरली होती. हरियाणातील हिस्सार मध्ये मैदानी भागातील सर्वात कमी ३.५ अंश सेल्सिअस इतके तापमान नोंदवले गेले. जम्मू, काश्मीर, लडाख च्य भागात ६ अंश सेल्सिअस च्या खाली किमान तापमान पोहचले आहे, तर दिल्ली, हरियाणा, हिमाचल प्रदेश, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्याच्या भागात ६ ते १० अंश सेल्सिअसच्य दरम्यान किमान तापमान नोंदविले गेले. दरम्यान, पुढील काही दिवस राजस्थान, पंजाब, हरियाणा, दिल्ली, हिमाचल प्रदेश या राज्यात थंडीच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे.

### बिबट्याच्या दहशतीच्या वातावरणातही...

त्यामुळं मतदान केंद्रांवर गर्दी कमी राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**मतदान करणं हा आपला हक्क :** बिबट्याची दहशत असताना ७३ वर्षीय आजींनं न घाबरता मंचर नगरपंचायत प्रभाग ४ अंतर्गत जिल्हा परिषद शाळा, लोंढेमळा या मतदान केंद्रावर सर्वप्रथम मतदानाचा हक्क बजावला, तर जुन्नर इथं देखील ८० वर्षीय आजोबांनी मतदानाचा हक्क बजावला. दरम्यान, देशाची लोकशाही बळकटीकरणाच्या कामी बिबट्याची दहशत बाळगण्याची गरज नाही, मतदारांनी पुढं येऊन मतदान करावं, असं आवाहन या ज्येष्ठ नागरिकांनी केलंय. तसंच मतदान करणं हा आपला हक्क आहे. निवडून येणाऱ्या सदस्यांना मतदार म्हणून आपण हक्कानं विकासकामं करण्याबाबत सांगू शकतो. लोकशाहीकरिता आपण काहीतरी केलं पाहिजे. या भावेनेनं मतदारांनी पुढं येऊन मतदानांचा हक्क बजावला पाहिजे, असं आवाहन देखील यावेळी ज्येष्ठ नागरिकांनी केलंय.

**मतदारांना मतदान केंद्रापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न :** दुसऱ्या बाजूला उमेदवार आणि त्यांचे कार्यकर्ते मात्र मतदारांना घराबाहेर काढण्यासाठी प्रचंड प्रयत्न करतील. सुरक्षिततेचे उपाय वाढवणे, स्वयंसेवकांच्या मदतीने गटाने मतदानाला जाण्याची व्यवस्था करणे, वाहनांची सोय उपलब्ध करून देणे अशा पद्धतींनी मतदारांना मतदान केंद्रापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. काही प्रभागांत लोकांना गटाने बाहेर पडण्याचं आवाहन करण्यात आलंय. वनविभागानेही काही भागात गस्ती वाढवली असून, नागरिकांनी शक्यतो एकटे बाहेर पडू नये, गटाने चालावे, आवाज करणारी साधनं बाळगावीत, असे सल्ले दिले आहेत.

**भोरमध्ये ईव्हीएमची हळदी-कुंकवानं पूजा :** पुणे जिल्ह्यातील भोरमधे भाजपा विरुद्ध राष्ट्रवादी अशी लढत आहे. दरम्यान, आज भोरमध्ये मतदानावेळी निवडणूक आयोगाच्या नियमांचं उल्लंघन झाल्याचं पाहायला मिळालं. भोरमध्ये मतदानावेळी ईव्हीएमची हळदी-कुंकवानं पूजा करण्यात आली. भोर नगर परिषदेच्या मतदान केंद्रावरील धक्कादायक प्रकार समोर आलाय.

### संचार साथी ॲपची सक्ती...

**सायबरसुरक्षा आवश्यक पण त्या नावाखाली...**

"फसवणुकीची तक्रार नोंदवणे आणि देशातील प्रत्येक नागरिक आपल्या फोनवर काय करत आहे, हे पाहणे यामध्ये खूप फरक आहे. गोष्टी अशा चालत नाहीत. फसवणुकीविरुद्ध प्रभावी व्यवस्था असावी, हे आम्ही सायबरसुरक्षेच्या चर्चांमध्ये नेहमी सांगितले आहे. सायबरसुरक्षा आवश्यक आहे, पण त्या नावाखाली नागरिकांच्या फोनमध्ये हस्तक्षेप करण्याचा अधिकार सरकारला नाही. कोणत्याही नागरिकाला हे मान्य होणार नाही." असे म्हणत प्रियंका गांधी यांनी 'संचार साथी' ॲपला विरोध दर्शवला.

**गोपनीयतेच्या हक्कांचे उल्लंघन**

विरोधकांच्या मते, "या नियमामुळे नागरिकांच्या मूलभूत गोपनीयतेच्या हक्कांचे उल्लंघन होईल आणि संविधानिक अधिकारांनाही धोका निर्माण होईल. हे ॲप मोबाईल सिस्टममध्ये प्रवेश करू शकते, सुरक्षा ॲप्लिकेशन हटवू शकते आणि एकदा सिस्टम लेव्हलवर बसवल्यानंतर ते काढताही येणार नाही."

**ॲप फक्त नागरिकांच्या सुरक्षेसाठी- दूरसंचार विभागाचे स्पष्टीकरण**

दूरसंचार विभागाने (DoT) च्या मते, संचार साथी ॲप नागरिकांच्या सुरक्षेसाठी विकसित करण्यात आले आहे. हे ॲप, फसवणूक करणारे कॉल आपोआप ब्लॉक करते. नंबर व्हेरिफाय करण्यात मदत करते. बनावट किंवा दुसऱ्याच्या आधारवर नोंदवलेल्या सिम कार्डची तत्काळ ओळख करते. डिजिटल फसवणुकीपासून संरक्षण देते. चोरीला गेलेले फोन IMEI नंबरवरून शोधण्यात मदत करते. DoT च्या म्हणण्यानुसार, या ॲपमुळे सायबर गुन्ह्यांमध्ये घट होईल आणि नागरिकांना सुरक्षेची खात्री होईल.

**मोबाईल उत्पादकांना कठोर निर्देश**

सरकारने स्मार्टफोन उत्पादक कंपन्यांना देखील कठोर सूचना दिल्या आहेत. ॲप लपवणे, ते डिसेबल करणे किंवा त्याच्या फंक्शनवर कोणतीही मर्यादा आणणे अशा कोणत्याही प्रकारचा प्रयत्न झाल्यास कंपनीवर कडक कारवाई केली जाईल.

विरोधकांनी आक्षेप घेतल्यामुळे आता सरकारकडून या विषयावर काय निर्णय घेतला जातोय, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

Printed, Published and Owned by Rakesh Shankar Gore and Printed at Somani Printing Press, Unit no.04, Ground Floor, N.K. Industrial Estate, off. Aarey Road, near Pravasi Ind. Estate, Gate no.2, Goregaon (east) Mumbai-400063, and Published at Shop no. १२, B-2, Sai Dham Shopping Center, Mangal Nagar,15 No. Last Bus Stop, Near G.C.C. Club, Mira Road (east), Dist: Thane-401107, Maharashtra. Editor-Rakesh Shankar Gore. RNI REG. No: MAHBIL/2023/86118. Office Contact no. 9702386118, Email: dainiklokrakshanay@gmail.com, Website: www.lokrakshanay.com (ठाणे न्याय कक्षेत)

# ग्रामीण भागातील जलस्रोतांची सुरक्षा आणि शाश्वतता दृढ करण्यासाठी जिल्हा परिषदेचा उपक्रम

## ठाणे जिल्ह्यात 'जेजेएम – स्त्रोत बळकटीकरण व शाश्वतीकरण' विषयक प्रशिक्षणास आजपासून प्रारंभ

**ठाणे (रोहित जैसवार) :** ग्रामीण भागातील पाणीपुरवठा व्यवस्थेची शाश्वतता, जलस्त्रोतांची सुरक्षितता आणि प्रभावी पाणी व्यवस्थापन या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी जिल्हा परिषद, ठाणेद्वारे जल जीवन मिशन (JJM) अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर व्यापक प्रशिक्षण कार्यक्रमास आजपासून सुरुवात करण्यात आली आहे.

ठाणे जिल्ह्यातील ४३१ ग्रामपंचायतींमधील प्रत्येकी ५ प्रतिनिधी या प्रशिक्षणात सहभागी होत आहेत. याप्रमाणे एकूण २,१५५ प्रशिक्षणार्थी आहेत. हा प्रशिक्षण कार्यक्रम १ डिसेंबर २०२५ ते ३० डिसेंबर २०२५ या कालावधीत एकूण ३५ बॅचेस मध्ये घेण्यात येत आहे.

प्रभावी पाणी व्यवस्थापनासाठी जलस्त्रोतांची सुरक्षितता आणि शाश्वतता एकत्रितपणे साध्य करणे. यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती (VWSC) सदस्यांची संस्थात्मक क्षमता वाढविणे आवश्यक आहे. या प्रशिक्षणाद्वारे समिती सदस्यांना पाणीपुरवठा योजनांचे नियोजन, अंमलबजावणी, देखभाल, स्त्रोत बळकटीकरण, जल गुणवत्तेची काळजी आणि दीर्घकालीन शाश्वतता याबाबत मार्गदर्शन केले जात आहे.

या प्रशिक्षण कार्यक्रम हिमालय इन्स्टिट्यूट फॉर एन्व्हायर्नमेंट ॲण्ड डेव्हलपमेंट, डेहराडून (उत्तराखंड) या मुख्य संसाधन केंद्रामार्फत घेतला जात आहे. राज्य स्तरावरील या मान्यताप्राप्त संस्थेच्या तज्ज्ञ प्रशिक्षणकांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण दिले जात असून संपूर्ण कार्यक्रम जिल्हा परिषद, ठाणे यांच्या समन्वयाने राबविण्यात येत आहे.



प्रशिक्षण क्लस्टर लेव्हल वर आयोजित करण्यात आले आहे, ज्यामुळे प्रत्येक क्षेत्रातील ग्रामपंचायतींना जवळच्या ठिकाणी प्रशिक्षण घेता येणार आहे. भारत सरकारने २०१९ मध्ये सुरू केलेले जल जीवन मिशन (JJM) हे ग्रामीण भारताच्या पाणीपुरवठा क्षेत्रातील क्रांतिकारक अभियान आहे. याचा उद्देश ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला वैयक्तिक घरगुती नळ कनेक्शन (FHTC) च्या माध्यमातून सुरक्षित आणि पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे हा आहे.

स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सतत उपलब्धता, सार्वजनिक आरोग्यात सुधारणा, महिला व मुलींवरील पाणी भरण्याचा भार कमी होणे, सामाजिक-आर्थिक विकासास गती, ग्रामपंचायती आणि स्थानिक समितींचा सक्रिय सहभाग यासाठी प्रशिक्षण महत्त्वाचे आहे.

JJM हे समुदाय-चलित (Community-driven) अभियान असून, ग्राम पाणीपुरवठा व्यवस्थापनात ग्रामीण भागातील समित्यांचा सहभाग महत्त्वपूर्ण मानला जातो.

जल जीवन मिशन अंतर्गत स्तर ३ (L३) प्रशिक्षणातील टप्पा-४ मध्ये ग्रामपंचायत स्तरावरील ५ प्रतिनिधींच्या गटाला खास "स्त्रोत बळकटीकरण आणि शाश्वतीकरण (Source Strengthening & Sustainability)" या विषयावर प्रशिक्षण दिले जात आहे. या प्रशिक्षणामुळे ग्रामपंचायत स्तरावर कार्यरत VWSC सदस्यांची क्षमता वाढेल, जलस्त्रोतांची सुरक्षितता, संवर्धन आणि शाश्वतता सुनिश्चित होईल, गावातील पाणीपुरवठा योजनांचे दीर्घकालीन व्यवस्थापन परिणामकारक होईल, गावस्तरावर पाणी व्यवस्थापनात स्वयंपूर्णता वाढेल, जलस्त्रोत टिकवून ठेवणे, पाण्याचे योग्य नियोजन व वापर, पाणलोट क्षेत्र विकास इत्यादींबाबत व्यवहार्य कौशल्य प्राप्त होईल. जिल्हा परिषद, ठाणे यांच्यावतीने या प्रशिक्षणाद्वारे जल जीवन मिशनच्या उद्दिष्टांची प्रभावी अंमलबजावणी होऊन ग्रामीण भागातील जलस्त्रोतांची शाश्वतता, सुरक्षितता आणि पाणीपुरवठा व्यवस्थेची गुणवत्ता अधिक मजबूत होण्यास निश्चितच मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

---

# 'भारतीय संविधान' हा 'दागिना' वाचवा - प्रा. ॲड. जयमंगल धनराज

## बौद्ध समाज सांस्कृतिक मंडळ यांच्या वतीने संविधान दिन, महात्मा ज्योतिबा फुले स्मृतिदिन साजरा

**कल्याण (आकाश कांबळे) :** कल्याण येथे बौद्ध समाज सांस्कृतिक मंडळ, कल्याण आयोजित भारतीय संविधान अमृत महोत्सव दिन आणि महात्मा ज्योतिबा फुले स्मृतिदिन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक व सांस्कृतिक बहुउद्देशीय भवन खडकपाडा कल्याण (प) येथे रविवारी साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अँड. घनशाम गायकवाड होते. तर प्रमुख वक्ते म्हणून माजी प्राचार्य ॲड. जयमंगल धनराज होते. यावेळी डॉ विकास जाधव यांनी संविधानाच्या प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन केले तर संस्थेचे सरचिटणीस मधुकर एन.साळुंके



यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक मांडले.

संविधान ७५ वर्ष पूर्ण होतात, ही खूप ऐतिहासिक बाब आहे. अंमलबजावणी न करून सत्ताधारी संविधानाला निकामी करत आहेत. ज्यांच्या रक्तात समतेचा झरा आहे. ती जातीपातीचे बंधने तोडून, ती लोक आपल्या जवळ येऊन चळवळीला अधिक बळकट केल्या शिवाय राहणार नाही. 'भारतीय संविधान' हा 'दागिना' वाचवा, संविधानाचा दागिना वाचवला तर संपत्ती आणि दागिन्यांची रेलचल पुढच्या पिढीला देखिल आनंदाने उपभोगता येईल. त्या साठी आम्ही सदैव निरंतर जागरूकपणे प्रयत्नरत राहू, ही आपली जबाबदारी आहे. आपल्या सर्वांसाठी संविधान आधार आणि आमचं रक्षक आहे. ते संविधान वाचलं पाहिजे. असे प्रा.अँड.जयमंगल धनराज यांनी बोलतांना सांगितले.

यावेळी भारतीय संविधान व डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर कवी मिलिंद जाधव, कवी अक्षय भोईर यांनी कविता सादर केल्या. तर प्रेम जाधव लिखित एकपात्री नाटकाचे सादरीकरण सुवर्णा जाधव यांनी केले. तर रजनी कांबळे, प्रकाश सावंत यांनी गाणी सादर केली.

यावेळी बौद्ध समाज सांस्कृतिक मंडळाचे उपाध्यक्ष व कार्यक्रमाचे अध्यक्ष अँड. घनश्याम गायकवाड, सरचिटणीस मधुकर साळुंखे, खजिनदार सदानंद गायकवाड, चिटणीस वसंत कदम, ऍड चंद्रकांत बाविस्कर, सदस्य डॉ. भगवान प्रधान, भगवान नरवाडे, ऍड.ए. आर.कांबळे, ॲड. मनोहर केदारे, सुनीता साळुंके, शैलेश दोंदे तर बौद्ध समाज सांस्कृतिक मंडळ, कल्याण अंतर्गत सांस्कृतिक कार्यकारी समिती व महिला समिती तर आदि उपस्थित होते.

---

# दिव्यात टोळक्याकडून दोघांवर वार; एकाचा मृत्यू तर ऐक गंभीर

## दिवा शहरात परप्रांतीयांची दहशत; महिनाभरातील दुसरी घटना

**ठाणे (विशेष प्रतिनिधी) :** दिव्यात परप्रांतीय टोळक्याकडून दोघांवर गंभीर हल्ला केल्याची घटना घडली आहे त्यात एकाचा मृत्यू तर दुसरा गंभीर जखमी झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. दिवा शहरातील गणेश पाड्यात रात्री ९:१५ वाजताच्या सुमारास परप्रांतीयाकडून दोन तरुणांवर जीवघेणा हल्ला झाल्याची घटना घडली आहे. गेल्या महिना भरातील ही दुसरी घटना घडली आहे. प्रकरणी आरोपीला मुंब्रा पोलीस स्टेशन अंतर्गत दिवा पोलिसांकडून मुख्य आरोपी ऋतिक दुबे यासह ५/६ जणांना अटक करण्यात आले आहे. अभिषेक पाटील (वय २२) व सुमित गावडे (वय २२) या दोघांवर मुख्य आरोपी ऋतिक दुबे यासह इतर ६/७ जणांच्या टोळक्याने धारदार शस्त्राने हल्ला करून गंभीर जखमी केले. गंभीर जखमी झालेला अभिषेक पाटील (वय २२) याचा दुर्दैवी




मृत्यू झाला असून जखमी सुमित गावडे वर छत्रपती शिवाजी महाराज रुग्णलयात उपचार सूरु आहेत. ठाणे महानगर पालिका हद्दीतील वि शहरातील गणेश पाडा, गणेश नगर, दिवा पूर्व येथील घटना आहे. प्रकरणी काही आरोपी पळून गेले असून आरोपी ऋतिक दुबेसह ५/६ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून पुढील तपास व कारवाई सुरु आहे.

---

# प्रशासन आणि सामाजिक संस्था यांच्या सतर्कतेमुळे मुरबाड मध्ये दोन बालविवाह थांबवण्यात यश

**ठाणे (विशाल कारंडे) :** कंट्रोल चाईल्ड हेल्पलाईन (१०९८) पुणे येथून १६ वर्षाच्या दोन मुलींचा बाल विवाह २४ नोव्हेंबर २०२५ होणार असल्याच्या संदर्भात अशी माहिती मिळाली. त्यांचे लग्न उद्या असून सायंकाळी ७ वाजता हळद आहे. त्याप्रमाणे त्यांची सविस्तर माहिती मिळविण्यात आली. याबाबत जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष यांना माहिती तातडीने देण्यात आली असता त्यांनी या संदर्भात संरक्षण अधिकारी आणि सामाजिक संस्था यांची मदत घेण्यास सांगितल्या प्रमाणे त्यांना कळविण्यात आले. त्याप्रमाणे आपण याबाबत सर्वांना कळवून मुरबाड पोलीस स्टेशन या ठिकाणी लेखी माहिती देऊन त्यांच्या मदतीने दिलेल्या ठिकाणी चाइल्ड हेल्प लाईनचे जिल्हा समन्वयक, स्थानिक पोलीस विभाग, पोलीस पाटील, महाराष्ट्र सामाजिक विकास ट्रस्ट आणि सेवा संस्था यांनी तात्काळ कार्यवाही करण्यास पोहोचलो असता त्या ठिकाणी बालिका घरी नव्हत्या आम्ही जाण्यापूर्वी



त्यांनी हळद थांबविली होती. प्रथम आपण त्याच्या पालकांचे समुपदेशन करून त्यांना असे सांगितले की, आपल्या बालिकेचे वय हे १८ वर्षे पूर्ण नसल्यामुळे आपण तिचा विवाह करू शकत नाही आणि जर तसे झाले असते तर आपणास बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ नुसार कायदेशीर कारवाई केली जाईल. त्याप्रमाणे त्याच्या पालकांनी संमती दर्शवली की, आम्ही आमच्या मुलीची लग्न १८ वर्ष पूर्ण होईपर्यंत लावणार नाही. तसेच यासंदर्भात बाल कल्याण समितीच्या अध्यक्ष मॅडम यांना फोनद्वारे बालविवाह विषयी माहिती दिली असता त्यांनी फोनवर पालकांशी संवाद साधला पालकांचे व बालकीचे समुपदेशन केले आणि त्यांना बाल कल्याण समिती समोर दि. २४ नोव्हेंबर २०२५ रोजी हजर राहण्यास सांगितले आहे. तसेच संपूर्ण महाराष्ट्र मध्ये बालविवाह मुक्त महाराष्ट्र - आपला संकल्प अभियान आणि भारतभर बालविवाह मुक्त भारत अभियान सुरु आहे. ही मोहीम १०० दिवसीय असणार आहे. आक्टोंबर ते २६ जानेवारी २०२६ पर्यंत चालू आहे.

अश्या प्रकारे बालविवाह होत (होणार) असल्यास किंवा बालकांचे शोषण होत असल्यास नागरिकांनी त्वरित १०९८ या चाईल्ड हेल्पलाईन संपर्क क्रमांकावर संपर्क करावा, असे महाराष्ट्र राज्य पुणे महिला व बाल विकास आयुक्तालय सह आयुक्त राहुल मोरे यांनी कळविले आहे.

---

# निवडणूक पुढे गेल्याने उमेदवारांची खर्चाची डोकेदुखी वाढली

**अंबरनाथ (सम्यक कासारे) :** न्यायालयीन अपील दाखल झालेल्या नगरपरिषदा व नगरपंचायती मधील सार्वत्रिक निवडणुकांसाठी सुधारित निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आल्याने अंबरनाथ ची दोन डिसेंबर रोजी होणारी निवडणूक आता २० डिसेंबर रोजी होणार आहे. त्यामुळे आता उमेदवारांची खर्चाची डोकेदुखी मात्र प्रचंड वाढली आहे. खर्च मर्यादेचा कोणताही अधिकृत कार्यक्रम जाहीर न झाल्याने खर्च मर्यादा शिथिल होणार का? या चिंतेत उमेदवार आहेत.

मागील चार नोव्हेंबर रोजी अंबरनाथ नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता. त्यानुसार अंबरनाथ मध्ये दोन डिसेंबर रोजी प्रत्यक्षात मतदान होणार होते. त्या अनुषंगाने उमेदवारांना अवघे २७ दिवस




■ पाच लाख रुपयांची खर्च मर्यादा असल्याने आम्ही ती मर्यादा पूर्ण केली होती. आता निवडणूक तब्बल १८ दिवस पुढे गेल्याने पुढचा खर्च कसा करायचा. ही चिंता सतावत आहे. निवडणूक आयोगाने ही खर्च मर्यादा आता शिथिल करावी.

**- कुणाल भोईर, उमेदवार, शिवसेना**

प्रचारासाठी मिळाले होते. त्यामुळे साम, दाम, दंड, भेद या उक्तीप्रमाणे अनेक उमेदवार आपल्याला निवडून येण्यासाठी प्रचाराला लागले होते. त्यासाठी खर्च मर्यादेचाही त्यांनी विचार केला नव्हता.

हा प्रचार शिगेला पोहचला असतानाच २९ नोव्हेंबर रोजी न्यायालयीन अपील दाखल झालेल्या नगरपरिषदा व नगरपंचायती मधील सार्वत्रिक निवडणुकांसाठी सुधारित निवडणूक कार्यक्रम जाहीर निवडणूक आयोगाने जाहीर केल्याने उमेदवारांच्या पायाखालची वाळू सरकली. सर्व तयारी झाली असताना, आवश्यक खर्चाचेही नियोजन पूर्ण झाले असताना अचानक निवडणुकीचा कार्यक्रमच बदलल्याने उमेदवार अक्षरशः गांगरून गेले आहेत. तब्बल १८ दिवस निवडणूक पुढे गेल्याने पुन्हा इतका खर्च कुठून करायचा असा सवाल काही उमेदवार खाजगीत विचारात आहेत.

अंबरनाथ मध्ये २६० उमेदवार नगरसेवक पदासाठी तर ८ उमेदवार नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक रिंगणात आहेत. नगरसेवक पदाच्या उमेदवारांसाठी ५ लाख तर नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारांसाठी १५ लाख रुपयांची खर्च मर्यादा निवडणूक आयोगाने आखून दिली आहे. मात्र आता १८ दिवस निवडणूक पुढे गेल्याने खर्चाची ही सांगड घालायची तरी कशी असा सवाल उपस्थित केला जात आहे.

---

# मध्य रेल्वेत दिवसेंदिवस वाढतोय बनावट तिकिटांचा व्यापार

**ठाणे (राकेश गायकवाड) :** मध्य रेल्वेमार्गावरून प्रवास करणारे काही प्रवासी वर्गापैकी ३०% प्रवासी नियमित तिकीट प्रवास करत असतात असा आरखडा मध्य रेल्वे प्रशासनाने काही दिवसांपूर्वी जाहीर केला होता. म्हणजेच मध्य रेल्वे प्रशासनाच्या म्हणण्यानुसार मध्य रेल्वे प्रशासनाने दर दिवशी प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांमधले बहुतांश प्रवासी विनातिकीट प्रवास करतात. व या फुकट्या प्रवाश्यांना आळा घालण्यासाठी मध्य रेल्वे प्रशासन नवनवीन शक्कल लढवत असते. परंतु सध्याच्या परिस्थितीमध्ये मध्य रेल्वेमार्गावर अजब प्रकार घडल्याचे कळले. काही विशिष्ट प्रवाशांने बनावट लोकल तिकीट व लोकलचे मासिक पास बनवले होते.



अशा प्रवाश्यांचा पर्दाफाश काही तिकिट तपासणीसाने केला आहे. ऐन गर्दीच्या काळामध्ये तिकीट तपासनीसांची नजर चुकवून भरपूर फुकटे प्रवाशी प्रवास करतात. मात्र अलीकडे तिकिटासाठी पैसे न खर्च करता देखील वातानुकूलित लोकल सेवेने व प्रथम दर्जाच्या लोकलने प्रवास करणे आधुनिक तंत्रज्ञानाने शक्य होते. मध्य रेल्वे प्रशासनाने गेल्याच आठवड्यात तब्ब्ल १३ बनावट तिकिट वापरणाऱ्या प्रवाशांना अटक करत त्यांच्यावर कारवाई केली आहे. या मध्ये काही प्रवाशांनी रेल्वेच्या युटीएस ॲपला हॅक करून म्हणजेच खाचून विविध लोकल रेल्वे सेवांचे पास बनवले होते. तर काही फर्जी प्रवाशांने कागदी तिकिटांवरील तारखेच्या आकड्यांमध्ये पेनाने घोळ केले होते. मात्र अशा प्रवाशांना तिकीट तपासणीसाने अटक करत कारवाई केली आहे.अशा प्रकारचा गुन्हा अंबरनाथ मध्ये राहणाऱ्या विवाहित जोडप्यावर झाला होता. पती कॉम्प्युटर इंजिनिअर आणि पत्नी शिक्षिका होती दोघांने निरनिराळे ॲपचे वापर करून वातानुकूलित लोकल सेवेने प्रवास करायचे मात्र २४ नोव्हेंबर, रोजी या जोडप्याचा छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील तिकीट तपासणीसांद्वारे पर्दाफाश करण्यात आला. त्यांवर मध्य रेल्वे प्रशासनांद्वारे दंडात्मक कारवाई करण्यात आल्याचे मध्य रेल्वे प्रशासनाचे जनसंपर्क अधिकाऱ्यांनी सांगितले.

अशा प्रकारे फुकटे प्रवाशी निरनिराळी शक्कल लढवून फुकट प्रवास करत असतात. अशा स्थितीत प्रत्येक लोकल रेल्वे सेवांमध्ये तिकीट तपासनीस नियुक्त केल्याने असे प्रकार वेळीच थांबतील. असे रेल्वे अभ्यासकांचे म्हणणे आहे. मध्य रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार असे गुन्हे करणाऱ्या प्रवाश्यांवर रेल्वे अंतर्गत ३०,००० इतपत दंड आकारण्यात येऊ शकतो अथवा दंड न भरल्यास तब्ब्ल ७ वर्ष तुरुंगवास शिक्षा देण्यात येते.

---

# कामगारांच्या न्याय हक्कासाठी श्रमजीवी संघटनेचे गुरुवारी केडीएमसीवर बेमुदत आंदोलन

**कल्याण (सुचित शिंदे) :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत कार्यरत सफाई कामगार व वाहन चालकांच्या मूलभूत हक्कांकडे सातत्याने दुर्लक्ष केले जात असल्याचा गंभीर आरोप श्रमजीवी कामगार संघटनेने केला आहे. यासंदर्भात संघटनेतर्फे गुरुवार, ४ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता केडीएमसी मुख्यालयासमोर बेमुदत आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. महानगर स्वच्छ ठेवण्यासाठी दिवस-रात्र कष्ट करणाऱ्या कामगारांना कामगार कायद्यानुसार मिळायला हवी ती सुरक्षा, सुविधा आणि मानधन मिळत नसल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. अनेकांना किमान वेतन सुद्धा मिळत नाही, पगारात तफावत ठेवली जाते, अत्याधिक काम करून घेतले जाते तरी ओव्हरटाईमचा मोबदला दिला जात नाही. सुट्टीच्या दिवशी काम करूनही वेगळे मानधन नाही, तर काहींना अचानक कामावरून कमी करण्याच्या घटना सुरूच आहेत. PF, ESIC, नियुक्तीपत्र यांसारख्या मूलभूत हक्कांची अंमलबजावणीही अत्यंत संथ आहे. कामाच्या ठिकाणी वैद्यकीय सुविधा, हेल्थ इन्शुरन्स आणि सुरक्षा साधने पुरवण्यात प्रशासन अपयशी ठरले असल्याचे संघटनेचे आरोप. कामगारांवरील वाढते अत्याचार, दुर्लक्ष आणि अन्याय संपेपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार संघटनेने व्यक्त केला आहे. "कामगारांच्या हक्कासाठी लढा सुरू आहे. सर्व कामगारांनी आंदोलनात सहभागी होऊन आपला आवाज बुलंद करावा" असे आवाहन संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे. काही सफाई कामगारांना नवीन ठेकेदाराने अजूनही कामावर घेतलेले नाही. पालिकेचे बऱ्याच वर्षापासून काम करून सुद्धा त्यांच्यासोबत त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आलेली आहे. कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी रोजंदारी काम करत हिंडावे लागत आहे.

# आंतरराष्ट्रीय अपंग व्यक्ती दिनाचे समाजशास्त्रीय चिंतन

**समाज ही केवळ लोकांची रचना नसून, तिच्या प्रत्येक घटकाच्या सहभागावर आधारित एक सजीव प्रणाली आहे, जिथे प्रत्येक व्यक्तीच्या जीवनमानाचा स्तर, संधी, अधिकार आणि सामाजिक प्रतिष्ठा त्याच्या शारीरिक, मानसिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिस्थितीवर अवलंबूनअसते. या दृष्टीने पाहिल्यास, अपंग व्यक्तींचा अनुभव केवळ वैयक्तिक अडचणींचा विषय नसून तो संपूर्ण समाजाच्या मानसिकता, मूल्य प्रणाली, धोरणे आणि व्यवहार यांचे प्रतिबिंब आहे. दरवर्षी ३ डिसेंबर रोजी साजरा केला जाणारा 'आंतरराष्ट्रीय अपंग व्यक्ती दिन' हा दिवस केवळ जागरूकता निर्माण करण्यापुरताच नाही, तर तो समाजातील समावेशी धोरणांचा विचार करण्याचा, अपंग व्यक्तींच्या जीवनातील अडचणी ओळखण्याचा, त्यांना समान संधी उपलब्ध करून देण्याचा आणि समाजातील नकारात्मक दृष्टिकोन बदलण्याचा महत्त्वपूर्ण प्रसंग आहे.**

समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून, अपंग व्यक्ती ही एक सामाजिक गट म्हणून दिसते, ज्यांच्यावर शारीरिक, मानसिक किंवा अन्य अडचणींमुळे अनेक स्तरांवर भेदभाव होतो, आणि त्यांच्या सामाजिक सहभागाला मर्यादा येतात. शिक्षणाच्या क्षेत्रात, अपंग व्यक्तींना अनेकदा विशेष शैक्षणिक साधने, समायोजने आणि सहाय्य उपलब्ध नसते, ज्यामुळे त्यांचे बौद्धिक, कौशल्यात्मक आणि सामाजिक विकासावर थेट परिणाम होतो. याचा प्रभाव भविष्यातील रोजगाराच्या संधींवर, आर्थिक स्वावलंबनावर, आत्मसन्मानावर आणि समाजातील प्रतिष्ठेवर पडतो. रोजगार क्षेत्रातही अपंग व्यक्तींना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते, जसे की कार्यक्षेत्रात आवश्यक सुविधा न मिळणे, अपंगतेवर आधारित पूर्वग्रह, किंवा त्यांच्या क्षमतांबाबत चुकीची समजुती निर्माण करणे. याचा थेट परिणाम त्यांच्या आर्थिक परिस्थितीवर, सामाजिक सहभागावर आणि मानसिक स्वास्थ्यावर होतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून हे स्पष्ट होते की अपंग व्यक्तींच्या जीवनातील ह्या अडचणी केवळ वैयक्तिक नसून त्या समाजाच्या मानसिकता, मूल्ये, धोरणे आणि सामाजिक संरचना यांच्याशी संबंधित आहेत. अपंग व्यक्तींच्या जीवनात करुणा, दया, उपेक्षा किंवा अस्वीकृतीची भावनाही समाजातील अपूर्ण मानसिक प्रतिमांनाचे प्रतीक आहे. जर समाजाने अपंग व्यक्तींविषयी सकारात्मक दृष्टिकोन ठेवला, त्यांना योग्य संधी उपलब्ध करून दिल्या, सार्वजनिक जागांमध्ये सुलभता निर्माण केली आणि शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि सांस्कृतिक कार्यक्रमात समावेश केला, तर समाजाच्या नैतिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रगतीला मोठा गती मिळेल. अपंग व्यक्तींचा सामाजिक सहभाग मर्यादित असल्यास त्यांच्या अनुभवांचा, मतांचा आणि कल्पनांचा समाजाच्या निर्णय प्रक्रियेत समावेश होत नाही, ज्यामुळे संपूर्ण समाजाच्या प्रगतीवर प्रतिकूल परिणाम होतो.

सामाजिक समावेश, समान संधी, सार्वजनिक स्वीकृती आणि न्याय यासाठी धोरणात्मक उपाय करणे ही फक्त नैतिक जबाबदारी नसून समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अत्यावश्यक आवश्यकता आहे. अपंग व्यक्तींना समान अधिकार आणि संधी उपलब्ध करून दिल्यास, ते केवळ स्वतःच्या जीवनात उन्नती करतात, तर समाजाच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रातही महत्त्वपूर्ण योगदान देतात. अपंग व्यक्तींच्या अडचणी शारीरिक, मानसिक किंवा संवेदनशीलता यांच्या पलीकडे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय स्तरावर प्रतिबिंबित होतात. सामाजिक जीवनात त्यांच्या सहभागाची मर्यादा असल्यास, समाजाच्या निर्णय प्रक्रियेत त्यांच्या अनुभवांचा आणि दृष्टिकोनांचा समावेश होत नाही, ज्याचा परिणाम संपूर्ण सामाजिक प्रगतीवर होतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून असे लक्षात येते की अपंग व्यक्तींच्या अडचणींचे निराकरण ही संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. योग्य शिक्षण, रोजगार, आरोग्य सेवा, सार्वजनिक सुविधा, सामाजिक जागरूकता आणि समावेशी धोरणे या माध्यमातूनच अपंग व्यक्तींच्या जीवनात सुधारणा घडवता येते.

जगातील अनेक देशांनी अपंग व्यक्तींना समान संधी आणि अधिकार सुनिश्चित करणारे कायदे लागू केले आहेत, परंतु प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी, समाजाची



मानसिकता बदलणे आणि सार्वजनिक स्वीकृती सुनिश्चित करणे हेच खरे उपाय ठरतात. अपंग व्यक्तींच्या जीवनातील अडचणींचा अभ्यास केवळ त्यांच्या अडचणी ओळखण्यापुरताच मर्यादित राहणार नाही, तर समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून त्यावर उपाय सुचवणे, सामाजिक समज वाढवणे आणि समावेशी समाज घडविणे आवश्यक आहे. अपंग व्यक्तींच्या जीवनातील सुधारणा ही केवळ त्यांच्या स्वतःसाठी नाही, तर समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण आहे. यासाठी शासन, शाळा, रोजगार क्षेत्र, समुदाय, कुटुंब आणि प्रत्येक नागरिकाचे सकारात्मक योगदान आवश्यक आहे. अपंग व्यक्तींना समान अधिकार, संधी आणि सार्वजनिक स्वीकृती उपलब्ध झाल्यास, ते स्वतःच्या जीवनात उन्नती करतात आणि समाजाच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि नैतिक प्रगतीतही मोलाचे योगदान देतात. समाजातील समावेश, सामाजिक न्याय, समान संधी आणि सर्वांगीक विकासासाठी अपंग व्यक्तींच्या जीवनमानातील सुधारणा ही अत्यंत गरजेची बाब आहे. सामाजिक अडथळे दूर करून, समान संधी, समावेश आणि सामाजिक स्वीकृती मिळवून देणे हाच खरा सामाजिक विकास मानला जातो. अपंग व्यक्तींच्या अडचणी दूर करण्यासाठी सामाजिक अभियान, सार्वजनिक धोरणे, सामूहिक चर्चासत्रे, शैक्षणिक कार्यक्रम आणि माध्यमांतून जनजागृती करणे आवश्यक आहे. हे उपाय फक्त कागदोपत्री नसून प्रत्यक्ष सामाजिक बदल घडवू शकतात. समाजातील प्रत्येक घटकाचे जीवन सन्माननीय असावे, सर्वांना समान संधी मिळाव्यात आणि अपंग व्यक्तींच्या जीवनात सुधारणा घडवून आणणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. अपंग व्यक्तींच्या जीवनातील अडथळे दूर करणे आणि त्यांना समान संधी देणे हे समाजाची नैतिक, सामाजिक आणि आर्थिक प्रगती सुनिश्चित करते.

३ डिसेंबर हा दिवस फक्त स्मरणार्थ किंवा जागरूकतेसाठी नाही, तर तो समाजातील प्रत्येक घटकाला विचार करण्याची, आपले मानसिक प्रतिमान बदलण्याची, आणि समावेशी धोरणे अंगीकारण्याची संधी देतो. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहता, अपंग व्यक्तींच्या जीवनातील सुधारणा हा प्रश्न समाजाच्या सर्व घटकांशी संबंधित आहे. अपंग व्यक्तींना समान संधी, स्वातंत्र्य, आणि सामाजिक स्वीकृती दिल्यास, ते स्वतःच्या जीवनात उन्नती करतात आणि समाजाच्या सर्वांगीक प्रगतीतही महत्त्वपूर्ण योगदान देतात. त्यामुळे आजच्या आंतरराष्ट्रीय अपंग व्यक्ती दिनानिमित्त समाजातील प्रत्येक नागरिकाने स्वतःच्या मानसिकतेचा आढावा घ्यावा, अपंग व्यक्तींविषयी संवेदनशीलता वाढवावी, आणि त्यांना समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात संधी देण्यासाठी प्रयत्न करावे. अपंग व्यक्तींच्या समस्यांचे निराकरण करणे, त्यांना समान अधिकार, संधी, आणि सामाजिक स्वीकृती मिळवून देणे ही केवळ सामाजिक जबाबदारी नाही, तर समाजाच्या नैतिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि सामाजिक प्रगतीसाठी अनिवार्य आहे.

आजही अनेक ठिकाणी अपंग व्यक्तींवर विविध स्वरूपातील भेदभाव दिसून येतो; सामाजिक समावेश, समान संधी आणि सार्वजनिक स्वीकृतीची गरज अजूनही पूर्ण झालेली नाही. त्यामुळे अपंग व्यक्तींच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक सहभागाला चालना देणे, त्यांच्या अधिकारांसाठी लढणे, आणि समाजातील नकारात्मक दृष्टिकोन बदलणे हे केवळ आव्हान नाही, तर सामाजिक जबाबदारी आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार केल्यास, अपंग व्यक्तींच्या जीवनातील सुधारणा ही केवळ त्यांची समस्या नाही, तर संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे, आणि त्यासाठी प्रत्येक घटकाला शासन, शाळा, कामकाजाचे ठिकाण, समुदाय आणि कुटुंब सकारात्मक भूमिका पार पाडणे आवश्यक आहे. अपंग व्यक्तींना समान संधी, स्वातंत्र्य आणि सामाजिक स्वीकृती मिळाल्यास, ते स्वतःच्या जीवनात उन्नती करतात आणि समाजाच्या सर्वांगीक प्रगतीतही मोलाचे योगदान देतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, अपंग व्यक्तींच्या जीवनातील सुधारणेचा प्रश्न हा संपूर्ण समाजाच्या प्रगतीशी जोडलेला आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय अपंग व्यक्ती दिन फक्त स्मरणार्थ दिवस नाही, तर तो समाजाला सुधारणा घडविण्यासाठी, सकारात्मक दृष्टिकोन अंगीकारण्यासाठी, आणि अपंग व्यक्तींना समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रेरित करणारा एक महत्त्वपूर्ण दिन आहे. समाजातील अपंग व्यक्तींच्या अडचणी दूर करून त्यांना समान संधी, समावेश आणि सामाजिक स्वीकृती मिळवून देणे हाच खरा सामाजिक विकास आणि मानवतेची खरी कसोटी आहे.

**- डॉ. राजेंद्र बगाटे (लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# नवीन फौजदारी कायद्यांचे प्रदर्शनातील प्रात्याक्षिकाद्वारे ज्ञान..!

देशात १ जुलै २०२४ पासून भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता व भारतीय पुरावा कायदा हे तीन नवीन कायदे लागू झाले आहेत. या नवीन फौजदारी कायद्यांच्या पार्श्वभूमीवर, नागरिकांना गुन्हा घडल्यापासून अंतिम शिक्षा होईपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया समजावी, यासाठी आयोजित करण्यात आलेल्या प्रदर्शनात प्रात्यक्षिक विशेष आकर्षण ठरले. या प्रात्यक्षिक प्रदर्शनाने गुन्हा नोंदणीपासून शिक्षा आणि पुनर्वसनापर्यंतचा संपूर्ण न्यायप्रक्रियेचा प्रवास अत्यंत स्पष्ट, जिवंत आणि लोकशिक्षणात्मक स्वरूपात मांडला आहे. नवीन फौजदारी कायद्यांमुळे वैज्ञानिक तपास, तत्काळ प्रतिसाद, डिजिटल पुरावे, कठोर शिक्षा आणि पीडित केंद्रित न्याय या तत्त्वांना प्राधान्य मिळाले आहे. हे प्रदर्शन जनजागृतीचा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरले आहे. प्रदर्शनात २५ ते ३० हजार नागरिकांनी भेट देऊन या कायद्यांसंदर्भातील ज्ञान अवगत केले.

भारताच्या न्यायप्रशासनात ऐतिहासिक बदल घडवणाऱ्या नवीन फौजदारी कायद्यांवर आधारित प्रात्यक्षिक प्रदर्शनाने नागरिक, विधिविद्यार्थी, पोलीस अधिकारी तसेच न्यायव्यवस्थेतील विविध घटकांना नव्या कायद्यांचा प्रत्यक्ष अनुभव देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. न्यायसंस्थेच्या सर्व स्तरांवर पारदर्शकता, गतीमानता आणि नागरिकाभिमुखता वाढवण्याच्या दृष्टीने तयार करण्यात आलेल्या या नव्या कायद्यांचे तत्त्वज्ञान, अंगभूत प्रक्रिया आणि त्यांचा प्रत्यक्ष वापर या प्रदर्शनामधून प्रभावीपणे उलगडण्यात आला.

**नियंत्रण कक्षातूनच पिडीतेला न्यायाची हमी**

नव्या कायद्यानुसार गुन्ह्याची नोंद करण्याची प्रक्रिया आणखी सोपी, डिजिटल आणि सर्वांसाठी उपलब्ध झाली आहे. प्रदर्शनात तयार केलेल्या नियंत्रण कक्षाच्या प्रतिकृतीमध्ये, नागरिकांकडून तक्रार स्वीकारणे, ऑनलाईन एफआयआर दाखल करणे, तक्रारदारास त्वरित स्वीकृती देत प्रतिसाद देण्याविषयी प्रात्याक्षिक दाखविण्यात आले. पीडित मुलगी जेव्हा नियंत्रण कक्षाला कॉल करते, त्यावेळी नियंत्रण कक्षाचे कार्य जनतेसमोर येते. पिडीतेला घाबरू नको, आम्ही तुझ्या पाठीशी आहे. हे शब्दच दिलासा देतात आणि न्यायाची हमी मिळवून देतात. नवीन कायद्यांमध्ये पीडितांचे हक्क अधिक मजबूत करण्यावर भर असल्याने तक्रारदाराला तपासाच्या प्रत्येक टप्प्याची माहिती देण्याची सक्ती करण्यात आली आहे. प्रदर्शनातील या विभागात नागरिकांना पीडित हक्क, महिलांसाठी विशेष संरक्षण आणि पोलीस तपासाची गतीने



हाललेली सूत्रे दाखविण्यात आली.

**तत्काळ, पारदर्शक आणि जबाबदार तपास**

प्रदर्शनातील पोलीस स्टेशन विभागात पोलिसांची भूमिकाच नव्या दृष्टीकोनातून मांडण्यात आली. नव्या फौजदारी संहितेनुसार पोलीस तपासाची वेळमर्यादा निश्चित करण्यात आली असून, तपासात अनावश्यक विलंब किंवा अधिकारांचा दुरुपयोग होऊ नये यासाठी कठोर नियम लागू केले आहेत. या विभागात सीसीटीव्हीयुक्त चौकशी कक्ष, महिलांच्या तक्रारींसाठी स्वतंत्र सुविधा आणित्वरितपंचनामा करण्याची आधुनिक पद्धत प्रत्यक्ष दाखवण्यात आली. यामुळे तपासाची पारदर्शकता आणि विश्वसनीयता वाढवण्याचा उद्देश स्पष्टपणे नागरिकांसमोर आला.

**न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेत पुराव्यांची अचूकता**

नवीन फौजदारी कायद्यांचे एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे वैज्ञानिक पुराव्यांना प्राधान्य देणे आहे. साक्षी पुराव्यांवरील अवलंबित्व कमी करून न्यायवैज्ञानिक पुरावे अनिवार्य करण्याचा प्रयत्न नव्या कायद्यांतून दिसून येतो. प्रदर्शनात मांडण्यात आलेल्या प्रयोगशाळा विभागात बोटांचे ठसे ओळखण्याची आधुनिक तंत्रज्ञान, रक्त, विष, केस, ऊतकांचे नमुने तपासण्याची प्रक्रिया, डीएनए प्रोफाइलिंग, डिजिटल फॉरेन्सिक मोबाईल, लॅपटॉप, सीसीटीव्ही फुटेज विश्लेषणामध्ये नवीन फौजदार कायद्यांमुळे आलेली गतिशिलता दाखविण्यात आली. सात वर्षकिंवात्यापेक्षाजास्तशिक्षाझालीअसल्यासअशागुन्ह्यांमध्येनवीनकायद्यांनुसार न्याय सहायक प्रयोगशाळेद्वारे पुरावे गोळा करण्याची सक्ती आहे. त्यानुसार मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन्स उपलब्ध करून देण्यात येत आहे. न्यायालयीन प्रक्रियेत विलंब टाळण्यासाठी तपास अधिकाऱ्यांना वैज्ञानिक पुरावे अनिवार्य करण्याबाबत नव्या कायद्यांनी स्पष्ट मार्गदर्शन केले आहे. प्रदर्शनातही हेच अधोरेखित करण्यात आले आहे.

**वैद्यकीय सहाय्य व विष शास्त्र विभागात पीडितांच्या न्यायाची प्रक्रिया वेगात**

गुन्हा घडल्यानंतर पीडितांना वेगाने न्याय मिळवून देण्यासाठी ही न्यायप्रक्रियेची अत्यंत आवश्यक पायरी आहे. नव्या कायद्यांनुसार अत्याचारग्रस्त, जखमी व्यक्ती, लैंगिक अत्याचार पिडीत यांच्या वैद्यकीय तपासणीबाबत अधिक स्पष्ट, संवेदनशील आणि कठोर तरतुदी करण्यात आल्या आहेत. प्रदर्शनातील या विभागात वैद्यकीय तपासणीची नव्या मानकांनुसार प्रक्रिया, अहवालांची कालमर्यादा, डॉक्टरांची जबाबदारी आणि नमुन्यांची शृंखला यांचे उत्कृष्ट स्पष्टीकरण दिले आहे. ऑनलाईन पद्धतीने नमुन्यांचे अहवाल संबंधित पोलीस स्टेशनला पाठविण्यात येत असल्यामुळे न्यायप्रक्रियेत गतीमानता आली असल्याचा सकारात्मक बदल प्रदर्शनातून दिसून येत आहे.

**अभियोग संचालनालयात तपास ते न्यायालयीन लढाईपर्यंतचा समन्वय**

नवीन कायद्यात अभियोजन विभागाची भूमिका अधिक बलवान करण्यात आली आहे. गुन्ह्याच्या तपासानंतर पोलिसांनी सादर केलेल्या अहवालाचे परीक्षण करण्यासोबतच, न्यायालयीन प्रक्रियेत दोषारोप सिद्ध करण्यासाठी आवश्यक पुराव्यांची शाश्वती तपासणे ही अभियोजनाची महत्त्वाची जबाबदारी असल्याचे दिसून येते. याविभागात आरोपींवर कोणत्या कलमांनुसार गुन्हा दाखल करता येईल. याबाबत मार्गदर्शन, पुराव्यांची मांडणी, साक्षीदार व्यवस्थापन, पीडितांचे प्रतिनिधित्व, न्यायालयीन दस्तऐवजांची तयारी या सर्व गोष्टींचे स्पष्टीकरण नव्या कायद्यांतील तरतुदींद्वारे नागरिकांना समजावून सांगण्यात आले.

**गतीमान न्याय आणि पारदर्शक कार्यपद्धती**

नव्या फौजदारी कायद्यानुसार न्यायालयीन प्रक्रियेतील अनावश्यक विलंब कमी करण्यासाठी अनेक सुधारणा करण्यात आल्या आहेत. दिवाणी न्यायालयात गुन्हेविषयी साक्षीदाराची ऑनलाइन साक्ष देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच व्हिडिओ कॉन्फरन्सिंग, वेळमर्यादा असलेली सुनावणी, पीडितांसाठी स्वतंत्र मार्गदर्शन, डिजिटल चार्जशीट, डिजिटल पुरावे या सर्व बाबींची नवीन फौजदारी कायद्यांच्या अनुषंगाने माहिती देण्यात आली. “गुन्हा घडला ते अंतिम शिक्षा” या संपूर्ण प्रक्रियेची साखळी नागरिकांना साध्या आणि समजण्यास सोप्या पद्धतीने प्रात्याक्षिकाद्वारे मांडण्यात आली. तारीख पे तारीख टाळण्यासाठी नवीन कायद्यांतील तरतुदींचा उहापोह करण्यात आला.

**नव्या कायद्यांद्वारे आरोपींसाठी योग्य दंड व्यवस्थापन**

प्रदर्शनातील महत्त्वाचा भाग म्हणजे नवीन फौजदारी कायद्यातील कलमानुसार शिक्षेची माहिती होय. दिवाणी न्यायालयाने ठोठाविलेल्या शिक्षेला मा. उच्च न्यायालयात होत असलेली सुनावणी प्रात्याक्षिकाद्वारे दाखवित हुबेहुब न्यायालयातील प्रसंग उभा करण्यात आला. पारंपरिक शिक्षेच्या पद्धतीत काही बदल करून, समाजहित, पुनर्वसन आणि दंडाची प्रभावीता वाढवण्याकडे कायदा अधिक झुकत असल्याचे या विभागातून स्पष्ट केले गेले. कायदे अधिक स्पष्ट, काटेकोर आणि गुन्ह्यांच्या स्वरूपानुसार वर्गीकृत असल्याने तपास, अभियोजन आणि न्यायालयीन निर्णय सुलभ झाले आहेत.

**प्रदर्शनात प्रश्नावलीच्या माध्यमातूनही कायद्याचे ज्ञान**

नवीन फौजदारी कायद्यांवर आधारित हे प्रात्यक्षिक प्रदर्शन केवळ कायद्यांची माहिती देणारे नव्हते, तर भारतातील न्यायव्यवस्थेतील परिवर्तनाची सशक्त झलक होते. गुन्हा नोंदवण्यापासून अंतिम निकालापर्यंतची प्रक्रिया अधिक तांत्रिक, पारदर्शक, जलद आणि नागरिकमैत्री बनवण्याचा उद्देश स्पष्टपणे सर्वांसमोर आला. नव्या कायद्यांची मांडणी, तंत्रज्ञानाचा उपयोग, वैज्ञानिक तपासाला दिलेले प्राधान्य, पीडितांचे हक्क आणि न्यायप्रक्रियेतील गतीमानता या सर्व माध्यमांतून भारताची न्यायव्यवस्था अधिक सक्षम, संवेदनशील आणि आधुनिक होत असल्याचा संदेश या प्रदर्शनाने परिणामकारकपणे दिला. प्रदर्शनामध्ये विविध कलमांच्या माहितीचे पोस्टर्स आकर्षक रंगसंगतीने दाखविण्यात आले आहे. प्रदर्शनात केवळ सादरीकरणच नाही, तर कायद्याविषयी अधिक सखोल माहिती होण्यासाठी १० प्रश्नांची दोन मिनिटे कालावधी असलेली डिजिटल स्वरूपातील प्रश्नावलीच्या स्क्रीन्स ठेवण्यात आहेत. या स्क्रीनवर नागरिक प्रश्नांची उत्तरे देऊन या कायद्यासंबंधित अधिक माहिती जाणून घेत आहेत. तसेच प्रदर्शनाबाबत डिजिटल स्वरूपात प्रतिसाद देण्याची व्यवस्थाही करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे कारागृहांमध्ये कैद्याकडून निर्मित वस्तूंचे स्टॉल्सही या ठिकाणी होते.

या प्रदर्शनात नागरिकांना गुन्हा घडणे, त्याची नोंद, तपास, वैज्ञानिक पुरावे, वैद्यकीय सहाय्य, अभियोजन, न्यायालयीन सुनावणी आणि अंतिम निकालापर्यंत न्यायव्यवस्थेची संपूर्ण साखळी नव्या पद्धतीने समजावून सांगण्यात आली. त्यामुळे जुन्या कायद्यातील कलमे आणि नवीन फौजदारी कायद्यांतील कलमांचे ज्ञान सहजरित्या नागरिकांना मिळाले.

**- निलेश तायडे**

# इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेडमध्ये बंपर भरती




इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड (IOCL) ने तरुणांसाठी एक महत्त्वपूर्ण भरती मोहीम जाहीर केली आहे. या उपक्रमाद्वारे रिफायनरी विभागात व्यापार, तंत्रज्ञ आणि पदवीधर अप्रेंटिस पदांसाठी २,७००० हून अधिक पदे भरली जातील. अधिकृत अधिसूचना जारी करण्यात आली आहे. पात्र आणि इच्छुक उमेदवार २८ नोव्हेंबर २०२५ ते १८ डिसेंबर २०२५ पर्यंत अर्ज करू शकतात. अर्ज करण्यासाठी अधिकृत वेबसाइटला भेट द्या.

या भरतीसाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. १८ डिसेंबरच्या रात्रीपर्यंत फॉर्म भरता येतील. देशभरातील विविध रिफायनरीजमध्ये २,७५५ अप्रेंटिस पदे रिक्त आहेत हे लक्षात घ्यावे. ज्यांनी १२वी, आयटीआय किंवा डिप्लोमा पूर्ण केला आहे आणि उद्योग प्रशिक्षणाद्वारे करिअर घडवण्यास इच्छुक आहेत त्यांच्यासाठी ही संधी आदर्श आहे. आयओसीएलने लेखी परीक्षेची तात्पुरती तारीख २९ डिसेंबर २०२५ निश्चित केली आहे. निकाल ९ जानेवारी २०२५ पर्यंत जाहीर केले जातील.

गुजरात रिफायनरीत ५८३ पदांसाठी, पानिपत रिफायनरी आणि पेट्रोकेमिकल कॉम्प्लेक्समध्ये ७०७ पदांसाठी, मथुरा रिफायनरीत १८९ पदांसाठी, बरौनी रिफायनरीत ३१३ पदांसाठी, हल्दिया रिफायनरीत २१६ पदांसाठी, पारादीप रिफायनरीत ४१३ पदांसाठी, डिग्बोई रिफायनरीत १० पदांसाठी, बोंगाईगाव रिफायनरीत १४२ पदांसाठी आणि गुवाहाटी रिफायनरीत ८२ पदांसाठी भरती होणार आहे.

**पात्रता -** ट्रेड अप्रेंटिससाठी, उमेदवारांकडे गणित, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र किंवा औद्योगिक रसायनशास्त्र यासह कोणत्याही विषयात ३ वर्षांची बी.एससी. पदवी असणे आवश्यक आहे. टेक्निशियन अप्रेंटिससाठी, संबंधित अभियांत्रिकी क्षेत्रात ३ वर्षांचा डिप्लोमा आवश्यक आहे. ट्रेड अप्रेंटिससाठी , उमेदवारांकडे संबंधित ट्रेडमध्ये मॅट्रिकची पदवी आणि दोन वर्षांचे आयटीआय प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

**निवड प्रक्रिया -** या पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांचे वय १८ ते २४ वर्षांच्या दरम्यान असणे आवश्यक आहे. ओबीसींसाठी वयोमर्यादा १८ ते २७ वर्षे आहे. एससी आणि एसटीसाठी उच्च वयोमर्यादा २९ वर्षे आहे आणि अपंगांसाठी उच्च वयोमर्यादा ३४ वर्षे आहे. या भरतीसाठी उमेदवारांची निवड गुणवत्तेच्या आधारे केली जाईल. शैक्षणिक गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार केली जाईल. त्यानंतर कागदपत्रांची पडताळणी आणि वैद्यकीय तपासणी केली जाईल. शेवटी, अंतिम निवड केली जाईल.

**अर्ज कसा करावा**

अर्ज करण्यासाठी, प्रथम iocl.com वर जा.

आता करिअर विभागात जा आणि अप्रेंटिस/भरती पर्याय निवडा.

आता ऑनलाइन अर्ज फॉर्मवर क्लिक करा.

तुमचा ईमेल आयडी आणि मोबाईल नंबर टाकून नोंदणी करा.

सर्व तपशील प्रविष्ट करा आणि संबंधित शुल्क भरून फॉर्म सबमिट करा.

शेवटी, फॉर्मची प्रिंटआउट घ्या आणि ती सुरक्षित ठेवा.

# प्रदूषणावर वेळीच नियंत्रण आणले नाही तर मोठा धोका



औद्योगिक क्षेत्रासह संपूर्ण क्षेत्रातील प्रदूषणावर नियंत्रण असने अती आवश्यक आहे. कारण भारतातील प्रदुषणाची पातळी दिवसेंदिवस वाढत आहे.औद्योगिकरण तसेच वैयक्तिक पातळीवर प्रदूषणाने अनेक ठिकाणी धोक्याची पातळी ओलांडल्याचे दिसून येते व यामुळे गंभीर परिणाम सुध्दा होतांना आपण पहातो. याचा विपरीत परिणाम मानव, पशु-पक्षी,जीव-जंतु,जीवसृष्टी, नैसर्गिक संसाधने, आणि हवामानावर होत आहे.यामुळेच आज आपल्याला स्थल,जल, वायू या तिन्ही ठिकाणी प्रदूषणाचा धोका वाढल्याचे दिसून येते.२ डिसेंबर १९८४च्या रात्री भोपाळ जवळील युनियन कार्बाईडच्या कारखान्यातून विषारी वायू गळती होऊन हजारो लोक मृत्युमुखी पडले.हा दिवस भारतसह जगासाठी काळीमा फासणारा ठरला.या दुर्घटनेची आठवण विशेषतः औद्योगिक क्षेत्रासाठी आणि यापुढे अशा घटना घडू नये यासाठी सर्वांनीच काळजी घ्यावी म्हणून २ डिसेंबर हा दिवस भारतात "राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिवस" म्हणून पाळला जातो.जगातील औद्योगिक क्षेत्रातील प्रदूषणाशी संबंधित दुर्घटनांमध्ये भोपाळ वायू दुर्घटना सर्वात भीषण आणि महाभयानक समजली जाते.अशाच प्रकारच्या दोन घटना अमेरिकेतील थ्री माईल आयलॅंड (१९७९) आणि रशियातील चेर्नोबिल (१९८६) या औद्योगिक क्षेत्रातील भयावह घटना घडल्या होत्या. म्हणजेच पृथ्वीसह संपूर्ण जीवसृष्टीला प्रदूषण विनाशाकडे नेतांना दिसत आहे.मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे त्यामुळे मानवच प्रदूषणावर नियंत्रण ठेवु शकतो.नद्यांच्या काठावर मानवी संस्कृती विकसित झाली. पुढे त्या मानवाच्याच साक्षीने त्या-त्या पध्दतीने सांस्कृतिक धरोहर घोषित करण्यात आली. परंतु ज्या नद्यांच्या काठावर मानवाने आपले वास्तव्य बनवीले त्या नद्यांमध्ये दुषीत पाण्याचा लोंढा आपल्याला मोठ्या प्रमाणात दिसुन येतो. पाण्याच्या दृष्टीकोनातून नद्यांच्या अवतीभवती मोठमोठी गावे वसायची व त्या नद्यांच्या पाण्याचा उपयोग शेतीच्या कामासाठी व पिण्याच्या पाण्यासाठी केला जात असे. परंतु आता परीस्थिती बदलेली दिसून येते.सध्याच्या परिस्थितीत नद्यांच्या अवतीभवती मोठमोठी औद्योगिक वसाहत पहायला मिळते.याच औद्योगिक क्षेत्रातील दुषीत पाणी नदीत सोडल्या जाते.त्यामुळे आपल्याला आजही अनेक मोठमोठ्या नद्या प्रदुषणाचा गंभीर मार झेलतांना दिसतात आणि यामुळे त्यांच्या आजूबाजूचा संपूर्ण परीसरात प्रदूषित झालेला दिसुन येतो. प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या सर्वेमध्ये असे लक्षात आले की देशातील प्रमुख नद्यांच्या १५० टापू प्रदूषीत असल्याचे सांगितले आहे.म्हणजेच नदि-नाले,तलाव, हवेतील वातावरण हे संपूर्ण प्रदुषणाकडे मोठ्या प्रमाणात वाटचाल करताना दिसत आहेत. याला मानवाने ताबडतोब रोखले पाहिजे अन्यथा अनर्थ होऊ शकतो याला नाकारता येत नाही. आज भारताची राजधानी दिल्ली प्रदुषणाचे माहेरघर बनली आहे.कारण कधी-कधी प्रदुषणाचे प्रमाण एवढे वाढुन जाते की शाळांना सुट्टी द्यावी लागते.कारण हिवाळयामध्ये वायू प्रदूषण अत्यंत धोकादायक स्थितीत येवून ठेपते.देशातील प्रदुषण फटाक्यांनी वाढते ही चुकीची कल्पना आहे.देशातील प्रदुषणामध्ये वाढ मुख्यत्वेकरुन औद्योगिकरण व वाहनांच्या दुषित धुरामुळे मोठ्या प्रमाणात होत आहे.फक्त दिवाळीचे एक-दोन दिवस फटाक्यांमुळे प्रदुषणात वाढ होते.त्याला फटाक्यांमुळे प्रदुषण झाले असे म्हणता येणार नाही.आज भारत प्रदुषणाच्या बाबतीत जगात आठव्या क्रमांकाचा प्रदुषित देश म्हणून गणना होते ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. भारतात प्रदुषण ही एक मोठी समस्या असुन भारतीय शहरात सरासरी पार्टिक्युलेट मॅटर(पीएम कण)२.५ हे ५३.३ मायक्रोग्रॅम आढळले.हे प्रमाण जागतिक आरोग्य संघटनेच्या सुरक्षित मर्यादेपेक्षा १० पट अधिक आहे. हा अहवाल स्वित्झर्लंडची संस्था आयक्यू एअरने दिनांक१४ मार्च २०२३ रोज मंगळवारला"वर्ल्ड एअर क्वॉलिटी रिपोर्ट"(जागतिक वायू गुणवत्ता अहवाल) नावाचा आपला अहवाल प्रसिद्ध केला. यावरून आपण समजू शकतो की प्रदुषणाच्या बाबतीत भारत अत्यंत गंभीर व धोकादायक स्थितीत आहे. जगातिल टॉप १०० सर्वाधिक प्रदूषित शहरांपैकी ६५ शहरे एकट्या भारतातील आहेत. यात मुख्यत्वे करून दरभंगा, आसोपूर, पाटणा,नवी दिल्ली, कोलकाता,मुंबई,हैद्राबाद,बंगळूरु, चेन्नई यांचा समावेश आहे. त्यामुळे प्रदूषणाच्या बाबतीत भारताची चिंता दिवसेंदिवस वाढतच आहे.वाढत्या प्रदुषणाचे मुख्य कारण म्हणजे वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण, जंगलकटाई, सांडपाणी, मोठ्या प्रमाणात वाहनांचे आवागमन, हवाई वाहतूक इत्यादींमुळे आज पृथ्वीतलावरील संपूर्ण जीवसृष्टीला धोका निर्माण झाला असून भयभीत आहे व यामुळे सर्वांचेच जगने अत्यंत कठीण झाले आहे.परंतु २ डिसेंबर राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिवस या निमित्ताने सर्वांनीच प्रदूषणावर नियंत्रण आणण्याचा संकल्प केला पाहिजे.जी-२० परिषदेत सुध्दा जागतिक स्तरावर प्रदुषण नियंत्रणावर मोठ्या प्रमाणात चर्चा करण्यात आली. देशातील शहरीकरणाचा रोखने, औद्योगिकरणावर नियंत्रण ठेवणे, भारतात सरकारी वाहने प्रदुषित धुळ जास्त ओकतात यावर अंकुश लागायला हवा.व देशातील जंगलतोड ताबडतोब थांबवून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला पाहिजे. वृक्षलागवड फक्त कागदावर नको तर कृतित व्हायला हवी.

# प्लास्टिक पाण्याच्या बाटलीचा वारंवार वापर घातक



शाळा महाविद्यालय जाणाऱ्या विद्यार्थ्यापासून गावी निघालेल्या प्रत्येक जण सोबत पिण्याचे पाणी बाळगून असतो सध्या हिवाळयाचे दिवस असल्याने अनेकांना झोपताना उशाला गरम पाण्याची बॉटल ठेवण्याची सवय असते थंडीच्या दिवसात गरम पाणी पिणे चांगली सवय आहे परंतु पाणी ठेवण्याचे साधन अयोग्य असल्यास गंभीर परिणाम भोगावे लागू शकतात असा इशाराच डॉक्टर देत आहेत त्यामुळे पाण्यासाठी जुन्या शीत पेयाच्या किंवा इतर प्लास्टिक बाटल्याचा वापर केल्यास गंभीर परिणाम भोगावे लागू शकतात प्लास्टिक बाटल्यांचा पुन्हा पुन्हा वापर केल्याने त्यामध्ये आरोग्याला अपायकारक असणारे अनेक विषारी रसायने तयार होत असल्याचे तज्ञांनी सांगितले.

**वारंवार वापर घातक**

कोल्ड्रिंक पाण्याच्या बॉटल्स वापरानंतर नष्ट करणे गरजेचे असते परंतु अशा बाटल्यांचा वारंवार फेरवापर केला जातो त्यामुळे अशा बाटल्यांमध्ये घातक रसायने तयार होतात पाण्यासोबत ती शरीरात गेल्यास हानिकारक ठरू शकते बाटल्यांचा अशा पद्धतीने वापर केल्यास कर्करोग देखील होण्याची शक्यता असते याबाबत संशोधन देखील सुरू आहे प्रवासात जाताना अनेक जण घरून पाण्याची बाटली भरून घेतात प्रवासात प्रवासातील उष्णतेमुळे या बाटल्या वितळून प्लास्टिकचे घातक आयुष्य पाण्यात मिसळण्याची शक्यता असते एकंदरीत प्लास्टिक बाटल्यांचा वारंवार वापर आरोग्यास घातक ठरू शकते

**इन्फेक्शन चा धोका**

बाटली एकदा उघडल्यावर त्यामध्ये विषाणू आणि बुरशी जमा होऊ लागते विशेष म्हणजे चांगल्या प्रकारे स्वच्छ न करताच बाटलीचा वापर केला तर आजार आज अदृ भावण्याची शक्यता असते याशिवाय प्लास्टिक पाटील बाटल्याचा पुन्हा पुन्हा वापर केल्याने पाण्यामध्ये शरीराला नुकसान पोहोचवणारे पलसिट साईजर्स आणि डायोकिरनसारखि रसायने निर्माण होण्याचा धोका संभवतो

**वातावरणाचा परिणाम**

प्लास्टिकच्या बाटल्या मध्ये गरम पदार्थ ठेवल्यास धोक्याची शक्यता दुपटीने वाढते तज्ञांच्या मते पोलीस कॉर्बोनेट प्लास्टिकच्या बाटली उघडलेले पाणी ठेवले तर बाटलीत असलेल्या बिस फेनोल नावाच्या केमिकलच्या निर्मितीची प्रक्रिया ५५ वाढते (बी पी ए )मुळे टेक्निकल ॲडव्हायझरी बोर्डाने (डी टी बी ए) अलीकडेच ड्रग्स पॅकेजिंग साठी प्लास्टिक बाटल्याच्या वापरावर निर्बंध घालण्याचा सल्ला दिला आहे आरोग्यास घातक

शेतकऱ्यांच्या बाटल्या रिकाम्या झाल्यावरही अनेक महिना पर्यंत फ्रीजमध्ये ठेवलेल्या असतात परंतु प्लास्टिकच्या बाटल्याचे पाण्याच्या वापरासाठी केलेले संकलन आरोग्यासाठी घातक ठरत आहेत कारण दीर्घकाळपर्यंत जुन्या बाटल्यांचा वापर केल्याने त्यामध्ये विषाणू आणि बुरशी सारखे घातक पदार्थ तयार होतात त्यामुळे कॅन्सर सारख्या गंभीर आजारांना निमंत्रण मिळण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# टोयोटा किर्लोस्कर मोटरने नोव्हेंबरमध्ये ३३,७५२ युनिट्सची विक्री केली

TOYOTA

टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम)ने नोव्हेंबर २०२५ मधील आपला विक्री अहवाल जाहीर केला असून एकूण ३३,७५२ युनिट्सची विक्री नोंदवली आहे. यापैकी ३०,०८५ युनिट्सची विक्री देशांतर्गत बाजारपेठेत झाली असून ३,६६७ युनिट्सची निर्यात करण्यात आली. टीकेएमने नोव्हेंबर २०२५ मध्ये २६,३२३ युनिट्सची विक्री केली होती यात वार्षिक २८ टक्क्यांची वाढ नोंदवत नोव्हेंबर २०२५ मध्ये ३३,७५२ युनिट्सची विक्री केली आहे.

टोयोटा किर्लोस्कर मोटरचे सेल्स-सर्विस-युज्ड कार बिझनेस उपाध्यक्ष वरिंदर वाधवा यांनी सांगितले की, ‘सरकारच्या प्रगतिशील जीएसटी सुधारणांमुळे बळ मिळालेल्या सकारात्मक सणासुदीच्या काळानंतर आम्हाला २८% वाढीसह विक्रीचा मजबूत वेग कायम दिसत आहे. अर्बन क्रूझर हायराइडर एयरो एडिशन आणि फॉर्च्यूनर लीडर एडिशनच्या अलीकडील लॉंचमुळेही आमच्या वाढीच्या प्रवासाला अधिक चालना मिळाली आहे, ज्यांना देशभरातून उत्कृष्ट प्रतिसाद मिळत आहे. ड्रम ताओसारख्या नवोन्मेषी उपक्रमांना आणि बेंगळुरूमध्ये सुरू केलेल्या ‘टोयोटा एक्सपीरिएन्शियल म्युझियम (टीईएम)’ला ग्राहकांकडून मिळणारा पाठिंबा आमचा ब्रँड कनेक्ट आणि ग्राहक सहभाग आणखी मजबूत करत आहे.”

टोयोटा किर्लोस्कर मोटरने जपानमधील जागतिक कीर्तीप्राप्त परफॉर्मन्स समूह आणि टोयोटाचे ब्रँड ॲम्बेसेडर ड्रम ताओ यांच्या १४ शहरांतील भारत दौऱ्याचे आयोजन केले आहे जो इंडो-जपानी सांस्कृतिक उत्सवाचा एक भाग आहे. ड्रम ताओची लाइव्ह सादरीकरणे चेन्नई, शिलाँग, बेंगळुरू, दिल्ली, कोलकाता आणि जयपूर येथे प्रेक्षकांना मोहून टाकत आहेत. आगामी कार्यक्रम कोहिमा, गुवाहाटी, इंदूर, वाराणसी, मुंबई, पुणे, चेन्नई, अंदमान आणि बेंगळुरू येथे होणार आहेत. देशभरातून मिळत असलेल्या उत्साहपूर्ण प्रतिसादासह हा दौरा २१ डिसेंबर २०२५ रोजी बेंगळुरू येथे संपन्न होईल. प्रेक्षकांना कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी टोयोटा किर्लोस्कर मोटरच्या अधिकृत वेबसाइटवर नोंदणी करता येईल.२३ नोव्हेंबर २०२५ रोजी टोयोटा किर्लोस्कर मोटरने ‘टोयोटा एक्सपीरिएन्शियल म्युझियम (टीईम)’ चे अनावरण केले जे जपानी सौंदर्यदृष्टी आणि भारतीय तत्त्वज्ञानाचा मल्टी-सेंसरी अनुभवातून सुंदर मेळ साधणारे, आपल्या प्रकारातील पहिलेच सर्वसमावेशक लाइफस्टाइल आणि सांस्कृतिक केंद्र आहे. टीईममध्ये इमर्सिव्ह एक्सपीरियन्स रूम्स, क्युरेटेड मर्चेंडाइज शॉप आणि खऱ्या जपानी माचा चहाचा आनंद देणारे कॅफे असे तीन प्रमुख विभाग आहेत.

# द बॉडी शॉपचे लिमिटेड एडिशन ख्रिसमस कलेक्शन लॉंच

द बॉडी शॉप या मूळ ब्रिटीश आंतरराष्ट्रीय एथिकल ब्युटी ब्रँडने मुंबईतील पॅलाडियम मॉल स्टोअरमध्ये त्यांचे लिमिटेड एडिशन ख्रिसमस कलेक्शन २०२५ लॉंच केले. २०२५ फेस्टिव्ह श्रेणीमध्ये तीन अद्वितीय हंगामी सेंट्स सादर करण्यात आले - कॅरेमल कडल, क्रॅनबेरी क्रश आणि शुगरप्लम पॅशन, तसेच विचारपूर्वक तयार केलेले गिफ्ट सेट्स देखील सादर केले, जे ब्रँडच्या मूल्यांना दाखवण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहेत. या लॉंचने आनंददायी गिफ्टिंग गंतव्य असलेल्या द बॉडी शॉपच्या जवळपास ५० वर्षांना साजरे केले.

प्रत्येक हंगामी श्रेणी द बॉडी शॉपच्या सिग्नेचर त्वचेला अनुकूल, नैसर्गिकरित्या मूळ घटकांसह, तसेच कम्युनिटी फेअर ट्रेड सहयोगांच्या माध्यमातून डिझाइन करण्यात आली. शॉवर जेल्समधील मेक्सिकोचे ॲलो वेरा, बॉडी योगर्टसमधील स्पेनचे आल्मंड मिल्क, बॉडी बटरमधील घानाचे शिया बटर अशा घटकांनी खात्री दिली की प्रत्येक गिफ्ट उत्तम आहे, ज्यामुळे समुदाय जवळ येईल आणि सकारात्मक परिवर्तनाला चालना मिळेल.




**कॅरेमल कडल :** सोनेरी कॅरेमल, क्रीमी व्हॅनिला आणि टोस्टेड आल्मंड यांच्या आरामदायी संयोजनाचा अनुभव ध्या. या मोहक व आरामदायी श्रेणीमध्ये कॅरेमल कडल बाथ अँड शॉवर जेल, बॉडी बटर, बॉडी योगर्ट आणि हँड बाम यांचा समावेश आहे. हे सर्व तुम्हाला दैनंदिन नित्यक्रमामध्ये उत्साही व उत्सवी आनंद देण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहे. बाथ अँड शॉवर जेल (५९५ रूपये), बॉडी बटर (१,६९५ रूपये), बॉडी योगर्ट (१,४९५ रूपये) आणि हँड बाम (५९५ रूपये).

**क्रॅनबेरी क्रश :** फ्रोस्टेड क्रॅनबेरी, ब्लड ऑरेंज आणि उत्साहवर्धक पुदीनाच्या पानांसह उत्सवी उत्साहाचा आनंद घेण्यास सज्ज राहा. क्रॅनबेरी क्रश श्रेणीमध्ये बाथ अँड शॉवर जेल, बॉडी बटर, बॉडी योगर्ट, बॉडी मिस्ट आणि हँड क्रीमचा समावेश आहे. ही श्रेणी तुम्हाला उत्साहित करण्यासाठी आणि सुट्टीच्या हंगामामध्ये अधिक आनंदाची भर करण्यासाठी परिपूर्ण आहे. बाथ अँड शॉवर जेल (५९५ रूपये), बॉडी बटर (१,६९५ रूपये), बॉडी योगर्ट (१,४९५ रूपये), हँड क्रीम (५९५ रूपये) आणि बॉडी मिस्ट (१,४९५ रूपये).

**शुगरप्लम पॅशन :** प्लम सॉर्बेट, रॅस्पबेरी व गुलाबी द्राक्षांच्या उत्साहवर्धक नोट्ससह फळे व फुलांच्या सुगंधाचा अनुभव ध्या, ज्यामध्ये जर्दाळू फूल व मग्नोलियाचा सुगंध देखील आहे. शुगरप्लम पॅशन बाथ अँड शॉवर जेल, बॉडी बटर, बॉडी योगर्ट, हँड बाम आणि बॉडी मिस्ट अद्वितीय व जादुई अनुभव देतात. बाथ अँड शॉवर जेल (५९५ रूपये), बॉडी बटर (१,६९५ रूपये), बॉडी योगर्ट (१,४९५ रूपये), हँड बाम (५९५ रूपये) आणि बॉडी मिस्ट (१,४९५ रूपये).

यंदा द बॉडी शॉपने सुट्टीच्या हंगामासाठी अद्वितीय गिफ्टिंग गंतव्य म्हणून आपली परंपरा कायम ठेवली आहे. वैयक्तिक व विचारशील गिफ्टिंगवर लक्ष केंद्रित करण्यासह ब्रँडने सहा सुरेखरित्या क्रिएट-युअर-ओन (सीवायओ) बॉक्सेस डिझाइन केले आहेत, ज्यासह ग्राहक त्यांचे स्वत:चे विचारशील गिफ्ट बॉक्सेस तयार करू शकतात.

# चविष्ट भोपळ्याचं भरीत

खाना-खजाना



**साहित्य :** चिरलेला लाल भोपळा- १ कप, हिरव्या मिरच्यांचे तुकडे- ३-४, कडीपत्त्याची पाने, भाजलेल्या दाण्याचा कूट- १ टेबलस्पून, किसलेलं ओलं खोबरं- १ टेबलस्पून,दही- २ टेबलस्पून, मोहरी, जिरे- प्रत्येकी १/२ टीस्पून, हिंग- १/२ टीस्पून, हळद -१/२ टीस्पून, कोथिंबीर, मीठ, साखर, तेल, पाणी


**कृती :** सर्वात आधी लाल भोपळयाच्या फोडी उकळत्या पाण्यात ७ ते ८ मिनिटे वाफवून घ्या.आता भोपळा शिजला की एका भांड्यात घेऊन मॅश करून घ्या.आता यामध्ये दही, दाण्याचा कूट, ओलं खोबरं, मीठ, साखर, कोथिंबीर घाला.आता फोडणीपात्रात तेल गरम करून मोहरी, जिरे, हिंग, हळद घालून खमंग फोडणी करा .त्यामध्ये हिरव्या मिरच्यांचे तुकडे, कडीपत्त्याची पाने घालून तयार फोडणी भरीतावर टाका.तुमचं चविष्ट लाल भोपळ्याचं भरीत तयार आहे.

दैनिक लोकरक्षणाय

सर्व सर्जनशील वाचकांसाठी संधी




माहितीयुक्त, जागरूकता पसरवणारे, कायद्याचे ज्ञान देणारे स्वलिखित लेख





भावनात्मक, जागरूकता पसरवणारे, ज्ञान-बोध देणारी स्वलिखित कविता




पौष्टिक आणि सत्त्वयुक्त, स्वादिष्ट, आगळ्या-वेगळ्या पाककला रेसिपी




सामन्यातून असामान्य, वीरता, यश, प्रेरणात्मक, बोध कथा




महाराष्ट्रातील विविध पर्यटन स्थळांची, समृद्ध सांस्कृतिक वारशाची माहिती

ध्यास+

समुदायातील सकारात्मक आवाजांना बळकटी देण्यासाठी एक व्यासपीठ

ध्यास सकारात्मकतेचा

# प्रेमाची रमणीय कथा ‘असा मी...अशी मी...’

आयुष्यात आलेल्या अनुभवांमुळे अनेकांचा प्रेम, नाती, त्यातील बांधिलकी यावरचा विश्वास उडालेला असतो, त्यामुळे पुन्हा नात्यात गुंतण्याचा मोह टाळणाऱ्या एका भावुक तरुणीची आणि तितक्याच मस्तकलंदर प्रौढ पुरुषाची रमणीय कथा ‘असा मी...अशी मी...’

युनायटेड किंगडम देशात वास्तव्यास असलेल्या छायाचित्रकार वैभव राजाध्यक्ष (अजिंक्य देव) आणि अनघा देशमुख (तेजश्री प्रधान) यांच्यात हळुवार फुलणारी रमणीय प्रेमकथा आहे. वैभव हा कोल्हापूरचा. आई-वडील वेगळे झालेले, त्यामुळे वैभवचे आयुष्य चेंडूसारखे कधी आईकडे कधी वडिलांकडे. त्या दोघांच्या निधनानंतर काका-काकू त्याचा सांभाळ करतात. छायाचित्रकार काकांचा कॅमेरा हाताळता हाताळता तोही छायाचित्रकार होतो.

लंडनमध्ये वास्तव्यास येतो. एकापेक्षा एक सुंदर मॉडेलची छायाचित्रे काढता काढता आवडलेल्या मॉडेल्ससोबत तो संबंधही ठेवतो, मात्र रात गई बात गई...या पलीकडे तो या संबंधांकडे पाहत नसतो. अशातच एक ट्रॅव्हल्स कंपनी चालविणाऱ्या कंपनीची संचालिका अनघाला तिच्या कंपनीच्या जाहिरातीसाठी मॉडेल्स हव्या असतात. त्यानिमित्ताने वैभव आणि अनघाच्या भेटीचा सिलसिला सुरू होतो. अनघाचे साधे, निरागस आणि लोभस व्यक्तिमत्त्व मॉडेलिंगसाठी परफेक्ट असल्याचे वैभव सुचवतो आणि अनघा मॉडेलिंगसाठी तयार होते.




फोटोग्राफीदरम्यान दोघे जवळ येतात. वैभव हा आपल्या प्रेमात पडल्याच्या सुखद जाणिवेत अनघा असतानाच दोघे एकमेकांपासून का दुरावतात आणि या गोड प्रेमकथेचा शेवट सुखद कसा होतो, दोन भिन्न रेषेत चालणारी माणसे एकाच दिशेने कशी चालू लागतात, हे चित्रपटातच पाहण्यासारखे आहे.

लग्नात प्रेमच नसल्याने वेगळी झालेली हळवी, पण खंबीर अनघा तेजश्री प्रधान यांनी छान उभी केली आहे. अजिंक्य देव यांचे या वयातही नायक म्हणून दर्शन सुखावणारे आहे. अनघाच्या वडिलांच्या भूमिकेतील संजय मोने, बिझनेस पार्टनर, मैत्रीण यशश्री मसूरकर आणि मित्र माधव देवचक्के या सगळ्यांनी कथानकाला साजेशा भूमिका केल्या आहेत. गाणी शब्दप्रधान आणि आल्हाददायक संगीतामुळे श्रवणीय झाली आहेत. परदेशातील आल्हाददायक वातावरणामुळे ही प्रेमकथा रमणीय अशी झाली आहे.

# लालीच्या जाळ्यात अडकेल का अजित?



‘देवमाणूस- मधला अध्याय’ मालिकेत अनेक घडामोडी घडताना दिसत आहेत. आर्या आणि साकेतमधील वादानंतर परिस्थिती गंभीर बनली. आर्या हा संपूर्ण प्रसंग अजीतला सांगते, आणि अजीत तिला बँकेतून पैसे काढण्यास प्रवृत्त करतो. मात्र, त्या व्यवहारासाठी साकेतची सही आवश्यक असल्याने तो नकार देतो. त्यामुळे त्यांच्यात तीव्र वाद निर्माण होतो. वाद वाढत असतानाच आर्या भावनिकदृष्ट्या अजीतच्या अधिक जवळ येऊ लागलेय. हे पाहून लालीच्या मनात मत्सर निर्माण होतो. दरम्यान, अजीत आर्याला भेटण्याचे प्रयत्न करत असताना साकेतविरुद्ध खोट्या अफवा पसरवण्याचे षड्यंत्रही आखतो, ज्यामुळे जामकरच्या मनातला संशय अधिक बळावणार आहे. अजीतच्या अफवांमुळे जामकर रागाने साकेतला जबरदस्तीने गाडीत बसवून घेऊन जातो. त्यांच्या मागोमाग अजीतही निघतो. एका निर्मनुष्य ठिकाणी जामकर साकेतला ठेवतो. अजीत साकेतला सामोरे जातो, ज्यातून त्यांच्या दोघांत संघर्ष होतो. रागाच्या भरात अजीत त्याचा खून करून त्याचे शरीर नदीत फेकून देतो.

पण त्याचवेळी शामल अजीतला साकेतचा खून करताना पाहते आणि भीतीने जंगलात पळते. तिच्या जीवाला धोका निर्माण होतो. त्याच जंगलात लालीने अजितला अडकण्यासाठी जाळं लावल आहे.

आता अजित लालीच्या जाळ्यात अडकेल? शामल, अजितच्या तावडीत सापडेल? जाणून घेण्यासाठी बघायला विसरू नका “देवमाणूस- मधला अध्याय” रोज रात्री १०वा. सदैव तुमच्या झी मराठीवर.

# अखेर पूजा झाली बांदेकरांची सून; सोहमसह थाटामाटात बांधली लगीनगाठ



अभिनेत्री पूजा बिरारी आणि अभिनेते आदेश बांदेकर यांचा लेक सोहम बांदेकर यांचा लग्नसोहळा पार पडला आहे. लोणावळयातील रिसॉर्टमध्ये या दोघांचा लग्नसोहळा मोठ्या थाटामाटात झाला आहे. गेल्या काही दिवसांपासून सोहम आणि पूजाच्या लग्नाची सर्वत्र जोरदार चर्चा सुरू होती. आता अखेर पूजा ही बांदेकरांची सून झाली आहे.

०२ डिसेंबर २०२५ रोजी पूजा आणि सोहमचं लग्न झालं. त्यापूर्वी मेहेंदी, संगीत, हळद हे सर्व विधी मोठ्या उत्साहात पार पडले. लोणावळयातील रिसॉर्टमध्ये त्यांच्या लग्नाची जंगी तयारी करण्यात आली होती. या लग्नाला कटुंबातील सदस्यांसह मराठी कलाविश्वातील अनेक सेलिब्रिटींनी हजेरी लावली होती. या दोघांच्या लग्नाचा व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आला आहे. लग्नातील पूजा आणि सोहमच्या वेडिंग लूकने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. लग्नात पूजाने गुलाबी रंगाची सुंदर साडी नेसून त्यावर पिवळ्या रंगाचा शेला घेतला आहे. तर, सोहमने देखील पूजाच्या साडीला मॅचिंग होईल असा बेबी पिंक रंगाचा डिझायनर कुर्ता घातल्याचं पाहायला मिळत आहे. या दोघांच्या पारंपरिक लूकचं कौतुक होत आहे. काही दिवसांपूर्वीच पूजाचं ‘येड लागलं प्रेमाचं’ या मालिकेच्या सेटवर पार पडलेल्या केळवणात सोहमसाठी उखाणा घेत पूजाने लग्नाची कबुली दिली होती. सध्या चाहते आणि कलाकार मंडळींकडून पूजा आणि सोहमवर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# धनुष की श्रेयस अय्यर? डेटिंगबाबत मृणाल म्हणते...



बॉलीवूड अभिनेत्री मृणाल ठाकूरचे नाव गेल्या काही दिवसांपासून अभिनेता धनुषसोबत जोडले जात आहे. दोघेही अनेकदा एकत्र दिसतात. आता नवी अफवा पसरली आहे. मृणाल आणि भारतीय क्रिकेटपटू श्रेयस अय्यर मागील काही महिन्यांपासून एकमेकांना डेट करत असल्याची. ही चर्चा मुख्यत्वे एका रेडिट पोस्टमुळे वाढली.

त्या पोस्टमध्ये दावा करण्यात आला होता की, दोघेही काही महिन्यांपासून एकमेकांना भेटत आहेत आणि आपले नाते लो-प्रोफाईल ठेवत आहेत. मात्र, या कोणत्याही दाव्याची अधिकृत पुष्टी कोणाकडूनही झाली नव्हती. रविवारी रात्री मृणालने आपल्या इन्स्टाग्राम स्टोरीवर एक मजेशीर व्हिडीओ शेअर केला. त्या व्हिडीओमध्ये ती चांगलीच हसताना दिसत होती आणि तिची आई तिच्या डोक्यावर चंपी करत होती. कॅप्शनमध्ये तिने स्पष्टपणे कोणाचेही नाव न घेता अफवांवर विनोदी टोला लगावला- ‘ते बोलतात.आम्ही हसतो अफवा म्हणजे फ्री पीआरच आहे आणि मला फ्री गोष्टी आवडतात.’ तिच्या या प्रतिक्रियेतून ती आपल्याबद्दल सुरू असलेल्या चर्चांना अजिबात गांभीर्याने घेत नसल्याचे दिसून आले. या पोस्टनंतर अनेकांना असे वाटत आहे की श्रेयस अय्यरसह तिच्या नात्याबद्दल फिरणाऱ्या अफवांमध्ये विशेष काही तथ्य नाही. मृणाल ठाकूरला प्रेक्षकांनी अजय देवगणच्या ‘सन ऑफ सरदार २’ मध्ये पाहिले होते. यापुढील काळात ती ‘है जवानी तो इश्क होना है’,‘डकैत’, ‘दो दीवाने सहर में’मध्ये दिसणार आहे.

# हिवाळ्यात सर्दी आणि खोकल्याचा त्रास होतो? हा चहा आहे फायदेशीर

हिवाळयात आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. या ऋतूमध्ये शरीर केवळ सुस्त होत नाही, तर रोगप्रतिकारक शक्ती देखील कमी होते. विषाणू आणि बॅक्टेरिया शरीरात लवकर प्रवेश करतात. यामुळे सर्दी खोकला आणि ताप येण्याची शक्यता वाढते. अशा काळात, रोगप्रतिकारक शक्ती वाढवणारे पदार्थांना प्राधान्य देणं गरजेचं आहे. रोगप्रतिकारक शक्ती चांगली असली की, सहज कोणत्याही आजारांपासून लढता येते. आवळयापासून बनवलेला चहा हा रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासाठी फायदेशीर आहे. आयुर्वेदात आवळयाला सुपरफूड मानलं जातं. यात व्हिटॅमिन ए आणि सी, फॉस्फोरस, मॅग्नेशियम, आयर्न आणि पोटॅशियम मुबलक प्रमाणात आढळते. चहा तर जाणून घेऊया आवळा चहा घेण्याचे फायदे

**आवळा चहाचे आरोग्य फायदे**

रोगप्रतिकारक शक्ती वाढवते: आवळा व्हिटॅमिन सीने समृद्ध आहे. त्यामुळे आवळा रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासाठी उत्तम मानला जातो. आवळयाचा चहा नियमित प्यायल्यास शरीराला बॅक्टेरिया आणि विषाणूंशी प्रभावीपणे लढण्यास मदत होते, असं प्रसिद्ध पोषणतज्ज्ञ शुभांगी तम्मलवार म्हणतात. आवळयाचे दाहक-विरोधी गुणधर्म घसा खवखवणे आणि सर्दीमुळे होणारी सूज यासारखी लक्षणे कमी करतात.

पचनाचे आरोग्य सुधारते: असं म्हटलं जातं की, आवळा खाल्ल्याने चयापचय सुधारते. विशेषतः बद्धकोष्ठतेची समस्या आवळा चहा पिल्यानं दूर होऊ शकते. शिवाय आवळा पाचक रसांच्या स्त्रावाला उत्तेजित करतो आणि पोषक तत्वांचे शोषण सुधारतो. परिणामी, अपचन आणि पोटफुगीसारख्या समस्या कमी होतात.

डोळयांच्या आरोग्यासाठी चांगले: आवळा डोळयांच्या आरोग्यासाठी खूप चांगला असल्याचं म्हटलं जातं. आवळयाचा चहा दृष्टी सुधारते आणि काचबिंदूसारख्या डोळयांच्या समस्या टाळते असं म्हटलं जातं. असंही म्हटलं जातं की, आवळयातील दाहक-विरोधी गुणधर्म डोळयांची सूज कमी करतात. तसंच डोळे लाल होणे आणि खाज सुटणे यासारख्या समस्या कमी करतात.

रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करते: आवळयामध्ये मधुमेहविरोधी गुणधर्म जास्त असल्याचं म्हटलं जाते. याच्या नियमित सेवनाने रक्तातील साखरेची पातळी कमी होते असं म्हटलं जातं. 2020 मध्ये जर्नल ऑफ आयुर्वेद अँड इंटिग्रेटिव्ह मेडिसिनमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, आवळयाचा अर्क ग्लुकोजची पातळी कमी करतो आणि इन्सुलिन संवेदनशीलता सुधारतो असं आढळून आलं.

कोलेस्टेरॉल कमी करते: आवळयातील अँटीऑक्सिडंट्स आणि इतर पोषक तत्वे वाईट कोलेस्टेरॉल कमी करतात आणि चांगले कोलेस्टेरॉल वाढवतात, ज्यामुळे हृदयरोगाचा धोका कमी होतो.

मुक्त रॅडिकल्समुळे होणारे नुकसान कमी करते: तज्ञांचं म्हणणं आहे की, आवळयातील व्हिटॅमिन सी एक शक्तिशाली अँटिऑक्सिडंट म्हणून काम करते. या फळात पॉलीफेनॉल, टॅनिन आणि फ्लेव्होनॉइड्स देखील असतात. हे सर्व शरीराला ऑक्सिडेटिव्ह ताण आणि मुक्त रॅडिकल्समुळे होणाऱ्या नुकसानापासून वाचवण्यासाठी खूप उपयुक्त असल्याचं म्हटलं जातं.

केस आणि त्वचेच्या आरोग्यासाठी उत्तम: आवळयातील व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट गुणधर्म केस आणि त्वचेच्या आरोग्यासाठी खूप चांगले आहेत असं तज्ञांचं म्हणणं आहे. ते केसांच्या कूपांना मजबूत करते आणि केस गळणे कमी करते असं त्यांचं म्हणणं आहे. तसंच, आवळयातील दाहक-विरोधी गुणधर्म त्वचेची जळजळ आणि मुरुमे कमी करतात आणि वृद्धत्वाची चिन्हे दूर करतात.

कर्करोग रोखते: आवळयातील अँटीऑक्सिडंट्स आणि इतर पोषक घटक विशिष्ट प्रकारच्या कर्करोगांना धोका कमी करण्यास मदत करतात असं म्हटलं जातं. एनआयएच सदस्यांच्या टीमने देखील याची पुष्टी केली आहे. (अहवालासाठी येथे क्लिक करा).

आवळयाचा चहा कसा बनवायचा: एका भांड्यात एक ग्लास पाणी घाला, त्यात एक चमचा आवळा पावडर, थोडे आलं, तुळशीची पाने आणि चिमूटभर भाजलेला जिरे पावडर घाला आणि ते चांगले उकळवा.

ते गरम असतानाच पिणे चांगले, त्यात मध आणि लिंबाचा रस देखील घालून तुम्ही पिऊ शकता. पर्यायी म्हणजे, ताजा आवळा देखील तुम्ही चहा तयार करण्यासाठी वापरू शकता. याकरिता आवळा किसून घ्या आणि मिक्सरमध्ये पेस्ट बनवा. ते पाण्यात उकळून चहाच्या स्वरूपात देखील घेता येते.






**मेष** – योग्य परिश्रमातून बऱ्यापैकी समाधान आणि आनंदाचा लाभ घेता येईल. आपल्या अधिकाराचा दुरुपयोग टाळा. धंद्यात काम मिळेल.

**वृषभ** – अनेक प्रांतांमध्ये आपला प्रभाव राहील. महत्त्वाची कामे आणि प्रकरणांना चालना देता येईल. स्पर्धा आणि साहसी कृत्ये टाळा.

**मिथुन** – कामकाजात तडफदारी दिसून येईल. सामाजिक कार्यात प्रतिष्ठा मिळेल. प्रवासात घाई करू नका. आवडत्या क्षेत्रात प्रगती होईल.

**कर्क** – नोकरीत अनुकूलता लाभेल. नवे निर्णय घेता येतील. विरोधकांना पुढे सरकू देऊ नका. कौटुंबिक वातावरण चांगले राहील.

**सिंह** – बौद्धिक युक्तीचा वापर करून बऱ्यापैकी प्रगती साधता येईल. मन उत्साहित होईल. समस्या सोडवण्याचा मार्ग शोधता येईल.

**कन्या** – वादाचे प्रसंग टाळा. व्यवहारात सावधानता बाळगा. आपल्या योजना आणि संकल्पांना उत्तेजन मिळेल. नवा विचार मिळेल.

**तूळ** – एखाद्या समस्येवर उपाय शोधता येईल. आनंदी राहाल. सावधपणे काम करा. आपली प्रतिष्ठा शाबूत ठेवता येईल. स्पर्धेत जिंकाल.

**वृश्चिक** – सध्या मोठ्या योजनांचा विचार करणे योग्य नाही. आपली स्थगित प्रकरणे पुढे सरकवता येतील. नव्या कार्याला दिशा मिळेल.

**धनु** – नव्या क्षेत्रात प्रवेश करणे आपणास शक्य होणार आहे. घरातील वातावरण प्रसन्न राहील. प्रवासाचे योग येतील. नवीन ओळख होईल.

**मकर** – कालचक्र अधिक वेगवान ठेवता येईल. संयमाने आपला कार्यभाग साधावा लागणार आहे. आपल्या विचारांना चालना मिळेल.

**कुंभ** – मोठी खरेदी करताना घाई करू नका. ठरवलेले काम पूर्ण करता येईल. कोणताही वाद वाढू देऊ नका. मान आणि प्रतिष्ठा मिळेल.

**मीन** – धंद्यात नव्या कामाचा शोध घ्याल. विरोधकांची धास्ती बाळगू नका. प्रवासाचा बेत ठरवाल. पदाधिकार मिळण्याची शक्यता आहे.

# जागतिक मत्स्यव्यवसाय दिनानिमित्त 'फिश रोग निदान व इको-फ्रेंडली तंत्रज्ञान' विषयक प्रशिक्षण संपन्न

रायगड (फरीद डावरे) : जागतिक मत्स्यव्यवसाय दिवसाच्या पार्श्वभूमीवर आयसीएआर–सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ फिशरीज टेक्नॉलॉजी (CIFT) मुंबई संशोधन केंद्रात "फिश रोग निदान, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि इको-फ्रेंडली पोस्ट-हार्वेस्ट टेक्नॉलॉजीज" या विषयावर एक दिवसीय प्रशिक्षण-सह-जागरूकता कार्यक्रम उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम NSPAD–PMMSY अंतर्गत आयसीएआर–CIFT नवी मुंबई व आयसीएआर–सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ फिशरीज एज्युकेशन (CIFE) वर्सोवा यांच्या संयुक्त विद्यमाने २१ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आला होता.



या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी १०.३० वाजता 'रिपोर्ट फिश डिसीज' ॲप नोंदणी व जनजागृती सत्राने झाली. श्री. साजन यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर आयसीएआर गान सादर करण्यात आले. स्वागत भाषण डॉ. अभय कुमार यांनी केले. यावेळी राष्ट्रपतींचे संदेश आणि "कुपोषणाविरुद्ध लढण्यासाठी मासे" या विषयावर डॉ. आशा के. के. यांनी माहिती दिली. प्रमुख पाहुणे श्री. जनार्दन जाधव (संचालक, कुमारी खुमारी कम्युनिटी इंटरनॅशनल ट्रस्ट) यांनी मत्स्य व्यवसायातील संधी, आव्हाने व नियोजनावर आपले विचार मांडले. यानंतर तज्ज्ञांचे विविध विषयांवरील व्याख्यानांचा क्रम सुरू झाला.

मासे रोग निदान (परजीवी रोगांवर विशेष भर) – डॉ. गायत्री त्रिपाठी

मूल्यवर्धित उत्पादने – डॉ. रेहाना

कोळंबी पालनातील सर्वोत्तम व्यवस्थापन पद्धती – डॉ. बबिता राणी

दुपारच्या भोजनानंतर तांत्रिक सत्रात पर्यायी ऊर्जा प्रणाली, प्रोबायोटिक्स आणि प्रतिजैविकांचे पर्याय, तसेच सूक्ष्मजीव रोगजनकांच्या पार्श्वभूमीवर माशांची स्वच्छतापूर्ण हाताळणी या विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

श्री. श्रावण शर्मा – पर्यायी इंधन व ऊर्जा प्रणाली

सुश्री आर. भारती रथिनम – प्रोबायोटिक्स : प्रतिजैविकांना पर्याय

डॉ. अभय कुमार – माशांची स्वच्छतापूर्ण हाताळणी

समारोप सत्रात कार्यक्रमाचा आढावा मांडण्यात आला. आभार प्रदर्शन श्री. श्रावण शर्मा यांनी केले. दुपारी ४.१५ वाजता राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. या प्रशिक्षणामुळे मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील शेतकरी, संशोधक, प्रशिक्षणार्थी व संबंधित घटकांना रोगनियंत्रण, पर्यावरणपूरक प्रक्रिया, मूल्यवर्धन आणि सुरक्षित हाताळणी तंत्रज्ञानाबाबत अद्ययावत ज्ञान मिळाल्याचे आयोजकांनी सांगितले.

# मुंबई विद्यापीठाच्या बॅडमिंटन संघाला रौप्य पदक

पाली/गोमाशी (भुषण सुतार) : खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स २०२५ या प्रतिष्ठित राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत मुंबई विद्यापीठाच्या बॅडमिंटन संघाने उत्कृष्ट कामगिरी करत रौप्य पदक पटकावले आहे. या यशस्वी संघात आनंद विश्व गुरुकुल ज्येष्ठ रात्र महाविद्यालयाचे विद्यार्थी अभ्युदय चौधरी आणि झाकूओ सेई यांनी प्रभावी भूमिका बजावली.




मुंबई विद्यापीठाच्या संघाने दमदार प्रदर्शन करत मणिपूर विद्यापीठ, एम.जी. विद्यापीठ केरळ आणि एस.आर.एम. विद्यापीठ आंध्र प्रदेश या संघांवर विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला.संघाचे मुंबई विद्यापीठाचे मॅनेजर व कोच प्रा. सुशांत दिवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली बॅडमिंटन संघाने उत्कृष्ट रणनीती आणि समन्वय दाखवत सर्वांचे लक्ष वेधले.

या उल्लेखनीय यशाबद्दल शारदा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष विलास ठूसे, संस्थेचे सचिव प्रा. डॉ. प्रदीप ढवळ, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. हर्षला लिखीते, तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

SPORTS

# Three-year-old Indian Prodigy Becomes Youngest Chess Player In The World To Achieve FIDE Ranking

**Sagar (MP) :** Three-year-old Sarwagya Singh Kushwaha from Madhya Pradesh may not know anything about the FIDE rankings or the Grandmaster status, but his skills as a chess player have been duly recognised by the International Chess Federation.

At the age of 3 years, 7 months, and 20 days, Sarwagya, who lives in Sagar district, has become the youngest chess player in the world to be ranked by the International Chess Federation, commonly referred to by its French acronym FIDE.






He is ranked 1572nd in the FIDE rankings. Previously, this record was held by Anish Sarkar of West Bengal, who achieved this feat at the age of 3 years and 8 months.

"My name is Sarwagya Singh Kushwaha," the young boy said as he spoke to ETV Bharat. Asked what places he has visited to play chess, he mentioned Khandwa, Bhopal, Chhindwara and Mangalore. Did he win at those places? The cute boys replied "yes" with a beaming face. The child prodigy said he would continue to play chess at places which are "good".

Sarwagya's parents and family are overjoyed with his achievement and want to see him become a Grandmaster. To achieve a FIDE ranking, one must defeat an international player. Sarwagya defeated three international-level chess players in a short period of time.

Initially, Sarwagya's parents helped him take an interest in chess to ensure he stayed away from smartphones. The young boy soon showed he was a natural when it came to playing the game.

After a few days of training, when he began to understand the game, his parents arranged for a personal coach and also provided online training. From there, Sarwagya never looked back. After just 6 months of training, he secured a place in the FIDE rankings.

His personal coach, Nitin Chaurasia and national instructor, Akash Pyaasi, worked hard to help Sarwagya master the game. They both trained him for about 4 hours a day and were amazed by his talent.

After being ranked by FIDE, Sarvagya Singh performed well in chess tournaments in Mangaluru, Khandwa, Chhindwara and several other cities.

"We are celebrating the achievement of Sarwagya. It's a matter of great pride and honour for us that our son has become the youngest chess player in the world to achieve a FIDE ranking. We see a bright future for him in chess. We want him to become a Grandmaster," said Siddharth Singh Kushwaha, father of the wonder kid.

"He learnt the rules and the movements of chess so quickly that we felt we should further educate him on chess. We hired a coach and arranged for personal classes. He played chess for about six hours a day and then became an expert," he said.

Sarvagya's mother, Neha Singh Kushwaha, said, "Whatever may be the achievement of Sarwagya, it would be good for us. Whether our dreams will come true or not depends on hard work and God's grace. God has blessed our child."

# SMAT 2025: Hardik Pandya Powers Baroda To Their Highest Successful Chase In Comeback Match

**Hyderabad :** Baroda all-rounder Hardik Pandya scripted a successful comeback to competitive cricket after staying away from the action for a span of two months. He led Baroda to a successful 223-run chase against Punjab on Wednesday in the round 4 match of the Syed Mushtaq Ali Trophy 2025-26 (SMAT) in Hyderabad.




Playing his first match since the Asia Cup in September, Hardik turned out to be expensive with the ball. In a dismal show with the ball, he leaked 52 runs in the four overs, taking the wicket of Anmolpreet Singh. Thanks to Abhishek Sharma's fifty, Punjab managed to post 222/8 in 20 overs.

During the chase, he walked at No.4 after Baroda openers Vishnu Solanki and Shashwat Rawat provided a stable platform for the batters coming after them. He built his innings steadily, designing the run chase brilliantly during his stay at the crease.

Hardik played a blinder of unbeaten 77 runs from 42 deliveries and smacked three consecutive sixes during his knock. The occasion also marked Baroda's highest-ever chase in the tournament, bettering their last year's 222-run chase against Tamil Nadu. Also, it is the third-highest successful chase in the tournament history after Mumbai (233/6 vs Andhra Pradesh, 2024) and Puducherry (228/6 vs Andhra Pradesh, 2021).

The win was important for Baroda as they managed to script a solitary win from the three matches before the fixture.

Hardik was away from action due to a left quadracep injury and missed the white-ball tour of Australia and the ongoing ODI series against South Africa. He arrived at the BCCI's Centre of Excellence for rehabilitation on October 15.

A fan also barged into the stadium to take a selfie with the star player before being removed by security. There was a high anticipation for Hardik's return to competitive cricket, and there were loud cheers for the Indian all-rounder.

# India Begin Their FIH Junior Women's World Cup Campaign With A Resounding 13-0 Victory Against Namibia

**Chile :** The Indian Junior Women's Hockey Team began their FIH Junior Women's World Cup campaign with a comprehensive 13-0 win against Namibia at the Centro Deportivo de Hockey Césped, Estadio Nacional in Santiago on Monday. Hina Bano (35', 35', 45') and Kanika Siwach (12', 30', 45') scored hat-tricks, while Sakshi Rana (10', 23') bagged a brace. Binima Dhan (14'), Sonam (14'), Sakshi Shukla (27'), Ishika (36'), and Manisha (60') also got on the scoresheet. With this win, India climbed to the top of the table.



India sprung into action from the get-go, registering their first shot on target and forcing a save out of the Namibia keeper in the opening thirty seconds of this contest. They remained on the front foot in search of a goal, earning a Penalty Corner with close to six minutes to go in the first quarter. They eventually made the early pressure count and bagged four goals in as many minutes to take control of the game. Sakshi Rana (10') opened the scoring with a brilliant reverse flick and Kanika Siwach (12') soon doubled their lead with a powerful finish. Binima Dhan (14') added a third with a sharp run and finish, while Sonam (14') scored a fourth after some neat interplay in the buildup, giving India a 4-0 lead after the opening fifteen minutes.

With a healthy lead, India continued to dominate as Sakshi Rana (23') scored her second with a superb run that was finished off with a thunderous strike. Namibia showed some aggression to look for an opening but were constantly kept at bay by the Indian midfielders dominating position. India then added a sixth as Sakshi Shukla (27') converted her dragflick from a Penalty Corner. Kanika Siwach (30') also scored her second goal at the stroke of half-time, extending India's lead to 7-0.

India were firmly in control and continued to stay on top to open the second half. Hina Bano (35') scored her first goal in the tournament with a ferocious strike into the top corner. She soon added another within a minute, capitalising on a loose restart from Namibia. Ishika (36') added a tenth after a rebound fell her way from a Penalty Corner, further cementing India's supremacy. Another kind deflection from a Penalty Corner fell Hina Bano's way (45') as she completed her hat-trick. Kanika Siwach (45') also registered her third goal from a Penalty Corner, establishing a 12-0 lead for India after three quarters.


Having made a few changes to begin the final quarter, India continued to create chances with their bench getting an opportunity to make their mark. Namibia fought hard in what seemed like what would be a goalless fourth quarter. However, Manisha (60') got herself on the scoresheet from Penalty Corner, completing a 13-0 route for India in their opening game.

# घोडबंदर रोडवरील ट्रॅफिकची समस्या कधी संपणार?; ठाण्यात वर्षभरात खड्डयांमुळे १८ जणांचा जीव गेल्याची हायकोर्टाकडून गंभीर दखल

**● मुंबई, विशाल कारंडे :**

कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या नाकर्तेपणामुळे मॅनहोलमध्ये पडून एका लहान मुलाचा मृत्यू झाल्याची जबाबदारी घेत मुलाच्या पालकांना ६ लाखांची नुकसानभरपाई देण्याचं मान्य केलंय. १३ वर्षीय आयुष कदमचे वडील एकनाथ कदम यांना पुढील दोन आठवड्यांत ही रक्कम दिली जाईल, असं केडीएमसीनं स्पष्ट केलंय. तसेच ठाण्यातील घोडबंदर रोडवरील भयावह परिस्थिती आणि या वर्षभरात ठाण्यात रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे झालेल्या १८ मृत्यूंच्या वृत्ताचीही हायकोर्टानं गंभीर दखल घेतलीय.

**घोडबंदर रोडवरील भयावह परिस्थिती कधी बदलणार? :** ठाण्याला उत्तर मुंबई, वसई-विरार, भिवंडी आणि गुजरातशी जोडणारा घोडबंदर रोड हा व्यापार आणि व्यवसायाच्या दृष्टीनं अतिशय महत्त्वाचा दुवा आहे. मात्र गायमुख घाटातील अरूंद रस्त्यामुळे इथं गेली अनेक वर्ष ट्रॅफिकची समस्या कायम असून, ती दिवसेंदिवस भयावह होत चाललीय. त्यामुळे याकडे प्रशासन गांभीर्यानं का पाहत नाही?, असा सवाल मंगळवारी हायकोर्टानं उपस्थित केला. तसेच ठाण्यात वर्षभरात खड्ड्यांमुळे रस्ते अपघातात एकही मृत्यू न झाल्याचा महापालिकेचा दावा फोल असल्याचा आरोप करत याचिकाकर्ते ॲड. रुजू ठक्कर यांनी हायकोर्टात धाव घेतलीय. काही वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार वर्ष २०२५ मध्ये ठाण्यात खराब रस्त्यांमुळे झालेल्या अपघातात १८ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती कोर्टाला दिली, याची गंभीर दखल घेत ही परिस्थिती सुधारण्यासाठी पुढील मान्सूनची वाट पाहू नका, अशी तंबी देत न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे आणि न्यायमूर्ती संदेश पाटील यांच्या खंडपीठानं ठाणे महापालिका आणि राज्य सरकारला १५ डिसेंबरच्या सुनावणीत उत्तर देण्याचे निर्देश दिलेत.



**काय आहे प्रकरण? :** मुंबई उच्च न्यायालयानं वर्ष २०१८ मध्ये खड्डे आणि रस्त्यांवरील उघड्या मॅनहोल्सच्या प्रश्नावर सविस्तर निर्देश दिलेले आहेत. त्याला अनुसरून रस्त्यांची देखभाल करण्यात महापालिका प्रशासन अपयशी ठरल्याचा आरोप करत ॲड. रुजू ठक्कर यांनी हायकोर्टात अवमान याचिका दाखल केलीय. ही याचिका निकाली काढताना यासंदर्भात काही समस्या आल्यास याचिकाकर्त्यांना पुन्हा हायकोर्टात दाद मागण्याची मुभा दिली होती. त्यानुसार उघड्या मॅनहोलचा प्रश्न अजूनही कायम असून, डोंबिवलीतील १३ वर्षीय मुलाचा मॅनहोलमध्ये पडून मृत्यू झाल्याच्या मुद्द्यावर रुजू ठक्कर यांनी या प्रकरणी हायकोर्टात नव्यानं याचिका दाखल केलीय. या याचिकेवर न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे आणि न्यायमूर्ती संदेश पाटील यांच्या खंडपीठासमोर मंगळवारी सुनावणी झाली.

**आयुष कदमच्या कुटुंबीयांना मिळणार नुकसानभरपाई :** २८ सप्टेंबर रोजी डोंबिवलीतील सरोवर नगर परिसरात एक लहान मुलगा भंडाऱ्याच्या जेवणासाठी घरातून बाहेर पडला होता. तिथं जेवण झाल्यानंतर तो एका उघड्या नाल्याजवळ हात धुण्यासाठी गेला असता, त्या लहान मुलाचा चेंबरमध्ये पडून मृत्यू झाला. या लहान मुलाचं नाव आयुष कदम (१३) असं होतं. या घटनेनं डोंबिवलीतील सरोवर नगर परिसर हादरून गेला. संबंधित घटनेची माहिती आयुषच्या मित्रांनी त्याच्या आई-वडिलांना त्वरित माहिती दिली. कुटुंबीयांनी आरडाओरड करत मदतीची याचना सुरू केली. "आमचा मुलगा नाल्यात पडलाय, कोणीतरी वाचवा", असा टाहो त्यांनी फोडला. पण घटनास्थळी असलेले लोक भंडाऱ्यातच मग्न होते, मदत करणं सोडून सर्वजण त्यावेळी केवळ बघ्याची भूमिका घेत होते. अखेर काही अग्निशामन दलाला बोलावण्यात आलं पण आवश्यक ती साधनसामग्री उपलब्ध नसल्यानं तेही नाल्यात उतरू शकले नाहीत. अशातच वेदांत जाधव या तरुणानं जीवाची बाजी लावत नाल्यात उडी घेतली. सुमारे आर्धा तास शोध घेतल्यानंतर त्यानं आयुषला बाहेर काढलं. कुटुंबीयांनी त्याला तातडीनं रुग्णालयात दाखल केलं, परंतु तोवर फारच उशीर झाला होता. डॉक्टरांनी दाखल करताच आयुषला मृत घोषित केलं होतं. हा अपघाती मृत्यू पालिकेच्या हलगर्जीपणामुळेच झाल्याचा आरोप करत हायकोर्टात ही याचिका दाखल झालीय. या पार्श्वभूमीवर मॅनहोल्सना संरक्षक जाळ्यांनी सुरक्षित करणं ही पालिका प्रशासनाची जबाबदारी आहे, ती पूर्ण केलीय का?, अशी विचारणा हायकोर्टानं महापालिकेकडे केली होती. त्यानुसार अखेर केडीएमसीच्या वतीनं जबाबदारी स्वीकारत मुलाच्या कुटुंबीयांना ६ लाखांची नुकसानभरपाई देण्याचं मान्य केलंय. तसेच संबंधित दोषी अधिकाऱ्यांची चौकशी सुरू असून, दंडाची ही रक्कम त्यांच्याकडून वसूल केली जाईल, असं पालिकेच्या वतीनं स्पष्ट करण्यात आलंय. यावर समाधान व्यक्त करत हायकोर्टानं केडीएमीला सहा आठवड्यांत आपला अहवाल सादर करण्याचे निर्देश दिलेत.

## पुण्यातील चांदणी चौक ते भूगाव रस्त्यावर नवीन उड्डाणपूल उभारणार?

**● पुणे, शकील शेख :**

कोकणातून पुणे शहरात प्रवेश करण्यासाठी वाहतूक कोंडीमुळे होणारा त्रास कमी करण्यासाठी चांदणी चौक ते भूगाव रस्ता विकसित करण्याचा निर्णय पुणे महापालिकेने घेतला आहे. या भागात उड्डाणपूल, तसेच समतल विलगक (ग्रेड सेपरेटर) तयार केला जाणार असून, या दोन्ही कामांसाठी महापालिकेने २०३ कोटी रुपयांचा खर्च करण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पांसाठी आवश्यक असलेली ८० टक्के जागा ताब्यात आल्यानंतर निविदा काढण्यात येणार आहे. या प्रकल्पाच्या खर्चाला महापालिकेच्या सोमवारी



झालेल्या अंदाज समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

चांदणी चौकातील वाहतूककोंडी सोडविण्यासाठी महापालिकेने यापूर्वीच या भागातील रस्त्यांचे रुंदीकरण केले आहे. शहराचे पश्चिम प्रवेशद्वार अशी या रस्त्याची ओळख आहे. चांदणी चौकातून भूगावकडे जाताना दोन किलोमीटरपर्यंत महापालिकेची हद्द आहे. या भागात ६० मीटर रस्ता महापालिकेच्या विकास आराखड्यात दर्शविण्यात आला आहे.महापालिकेची हद्द संपल्यानंतर पुढे पीएमआरडीएचा प्रस्तावित रिंग रोड आहे. हा रस्ता राष्ट्रीय महामार्गाला जोडला जाणार आहे. त्यामुळे चांदणी चौकातून पुढे भूगावकडे जाणाऱ्या रस्त्याचे रुंदीकरण करून येथे वाहतूककोंडी टाळण्यासाठी उड्डाणपूल, समतल विलगक तयार करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे.प्रकल्प विभागाचे मुख्य अभियंता दिनकर गोजारे यांनी ही माहिती दिली. 'या प्रकल्पासाठी काही खासगी जागांचे संपादन करावे लागणार आहे. एकूण भूसंपादनाच्या जागेपैकी ८० टक्के जागा ताब्यात आल्यानंतरच या कामांसाठी निविदा प्रक्रिया राबिण्याचा निर्णय महापालिकेने घेतला,' असे गोजारे यांनी सांगितले.

## सानपाड्यातील दैनंदिन बाजार सज्ज; व्यावसायिकांचे स्थलांतर पूर्णत्वास, नागरिकांना मिळणार दिलासा

**● नवी मुंबई, भावना जैन :**

सानपाडा सेक्टर ४ मधील दैनंदिन बाजाराची दीर्घकाळ प्रलंबित असलेली प्रतीक्षा अखेर समाप्त झाली आहे. अनेक अडचणी, बैठका आणि सुधारणा प्रक्रियेनंतर बाजार नागरिकांसाठी खुला करण्यात आला असून, एकाच ठिकाणी दैनंदिन आवश्यक वस्तू उपलब्ध होणार असल्याने स्थानिकांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

नवी मुंबई महापालिकेने शहरातील विविध नोडमध्ये वाढत्या फेरीवाल्यांवर नियंत्रण आणि नागरिकांना नियोजित



खरेदी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने दैनंदिन बाजार उभारणीचे काम हाती घेतले होते. त्याच अनुषंगाने सानपाडा सेक्टर ४ मधील भूखंड क्रमांक १७ वर १०४८ चौरस मीटर क्षेत्रफळात २०१८ मध्ये बाजाराची उभारणी सुरू झाली. कोरोनाच्या काळात कामाला वाढीव मुदत देण्यात आली आणि मार्च २०२१ मध्ये काम पूर्ण झाले. तथापि, वास्तूमध्ये हवा खेळती नसणे, तसेच स्टॉलच्या रचनेवरून व्यावसायिकांच्या आक्षेपांमुळे बाजाराचे उद्घाटन पुढे ढकलले जात होते. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार बाजाराच्या रचनेत आवश्यक बदल करण्यात आले. त्यानंतर ओटे वाटपाचा प्रश्न मार्गी लावण्यात आला. भाजी, फळे आणि मांस विक्रीसाठी असलेल्या ५८ परवानाधारक व्यावसायिकांना स्टॉलचे वाटप पूर्ण झाले असून, स्टॉलची मांडणी बाजारातील सर्व प्रवेशद्वारांवरून दिसेल अशा पद्धतीने करण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

**फेरीवाल्यांच्या गर्दीपासून सुटका**

या बाजारात भाजीपाला, फळे आणि मांस विक्रीसाठी एकूण १०५ भाजीपाला विक्रेते आणि १९ मासेविक्रेत्यांसाठी सुसज्ज ओटे, पिण्याचे पाणी, वीज आणि प्रसाधनगृह आदी सुविधा देण्यात आल्या आहेत. या बाजारामुळे नागरिकांना नियोजित पद्धतीने खरेदीची सुविधा मिळणार आहे. अनेक वर्षांपासून बंद असलेल्या संरचनेचा प्रश्न मार्गी लागल्याने स्थानिक रहिवासीही दिलासा व्यक्त करत आहेत. त्याशिवाय रेल्वे स्थानक परिसरात बसणाऱ्या फेरीवाल्यांच्या गर्दीमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. रेल्वे स्थानक परिसराला यामुळे बकाल स्वरूप प्राप्त झाले होते. मात्र, आता दैनंदिन बाजार सुरू होणार असल्याने ही गर्दी कमी होणार आहे. यानिमित्ताने सानपाडा रेल्वे स्थानकही मोकळा श्वास घेईल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे.

## महाराष्ट्र सदन येथे १२ ते १४ डिसेंबर दरम्यान 'महाराष्ट्र खाद्य महोत्सव'; दिल्लीकर खवय्यांसाठी मराठमोळी मेजवानी

**● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :**

महाराष्ट्राच्या खमंग खाद्य पदार्थांचा आस्वाद दिल्लीकरांना मिळावा या उद्देशाने राजधानी दिल्ली येथील महाराष्ट्र सदनात महाराष्ट्र खाद्य महोत्सवाचे आयोजन १२ ते १४ डिसेंबर २०२५ दरम्यान करण्यात आले असल्याची माहिती महाराष्ट्र सदनाच्या निवासी आयुक्त आणि सचिव आर. विमला यांनी दिली.

कस्तुरबा मार्गावरील महाराष्ट्र सदनात आयोजित या महोत्सवात महाराष्ट्राच्या विविध प्रादेशिक खाद्यसंस्कृतीचा आणि कलेचा संगम पाहायला मिळणार आहे. चवदार पदार्थांची रेलचेल दिल्लीकरांना या निमित्ताने अनुभवायला मिळणार आहे.

**प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांच्या हस्ते उद्घाटन; पाककृतींची मेजवानी**

या खाद्य महोत्सवाचे उद्घाटन महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध आंतरराष्ट्रीय शेफ विष्णू मनोहर यांच्या हस्ते होणार आहे. खाद्य महोत्सवामध्ये महाराष्ट्रातील विविध भागांतील वैशिष्ट्यपूर्ण पदार्थ उपलब्ध असतील. नागपूर विभागातील सावजी चिकन, मटण रस्सा, तर्री पोहा आणि संत्री-आधारित मिठाई; पुणे भागातील मिसळ-पाव, वडा पाव आणि पुरणपोळी, जळगावातील शेव भाजी, वांग्याचे भरित आणि केळीशी संबंधित पदार्थ; मालवणातील मालवणी सीफूड, कोंबडी वडे आणि सोलकढी; छत्रपती संभाजी नगरमधील नान कालिया, डालिंबी उसळ आणि स्थानिक बिर्याणी; तसेच कोल्हापुरी नॉन-व्हेजमधील तांबडा रस्सा, पांढरा रस्सा आणि कोल्हापुरी चिकन किंवा मटण यांचा समावेश असेल. हे पदार्थ महाराष्ट्राच्या समृद्ध पाककृती परंपरेचे प्रतिनिधित्व करतील.

या खाद्य महोत्सवात सातारा, कोल्हापूर, जळगाव,पुणे अमरावती, रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेतर्गत असलेले महिला स्वयंम सहायता समूह सहभागी होणार असून त्यांच्याकडील रुचकर पदार्थांचा देखील गरमागरम आस्वाद घेता येणार आहे.

**सांस्कृतिक कार्यक्रम आणि बालकांसाठी विशेष आकर्षण**

हा महोत्सव केवळ खाद्यपदार्थांपुरता मर्यादित नसून, महाराष्ट्राची समृद्ध कला आणि संस्कृती दर्शवणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रमही आयोजित करण्यात आले आहेत.लहान मुलांसाठी खास आकर्षण म्हणून 'करमणूकीचे'चे खेळ आणि जादूचे प्रयोग याचे आयोजन करण्यात आले. ज्यामुळे कुटुंबातील सर्व सदस्यांना या महोत्सवाचा आनंद घेता येईल.

**महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ स्टॉलद्वारे पर्यटन स्थळांचे दर्शन**

या महोत्सवात महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचा (एमटीबीसी) विशेष माहिती स्टॉल देखील असणार आहे. या स्टॉलद्वारे महाराष्ट्रातील ऐतिहासिक, धार्मिक आणि नैसर्गिक पर्यटन स्थळांची माहिती देण्यात येईल.

## कचरा जाळल्यामुळे वसई-विरारच्या हवा प्रदूषणात भर

**● वसई, सुचिता सोनावणे :**

वसई विरार शहरात जागोजागी मोठ्या प्रमाणावर कचरा गोळा होऊ लागला आहे. या कचऱ्याला आग लावून त्याची विल्हेवाट लावली जात आहे. धूळप्रदूषण, वाहनांची वाढती संख्या यामुळे वाढलेल्या वायुप्रदूषणात यात अधिकच भर पडली आहे.वसई विरार शहरात वाढत्या लोकसंख्येमुळे कचऱ्याची समस्याही गंभीर बनली. अशातच शहरात अनेक ठिकाणी कचरा जळण्याच्या, पेटवणाच्या घटना समोर येत आहेत यामुळे शहारात धुराचे प्रमाण वाढत चालले आहे. यामुळे शहरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. वसई विरार महापालिकेकडून कचरा



उचलण्यासाठी कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली आहे. पण, कंत्राटदाराकडून वेळेत कचरा उचलला जात नसल्यामुळे शहरात जागोजागी कचरा साचत आहे.

त्यात घराच्या डागडुजीतून आणि इमारतीच्या बांधकामात निघालेला राडारोडा रस्त्याच्या कडेला फेकला जात आहे. त्यात अनेक दुकानातील कचरासुद्धा रस्त्यावर टाकला जात आहे. यामुळे शहरातील रस्त्यावर कचऱ्याचे ढिग निर्माण होत आहेत. तर या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी स्वच्छता कर्मचाऱ्यांकडून तसेच नागरिकांकडून कचरा पेटवण्याचे प्रकार समोर येत आहेत. सातत्याने कचरा पेटवला जात असल्याने धुराचे लोट निघून हवेच्या माध्यमाने इतरत्र पसरत आहेत.

शहरात इमारतींची बांधकामे व रस्त्यावरील सुकलेल्या चिखलातून निर्माण होणारी धूळ, औद्योगिक वसाहतीतून निघणारा धूर, तसेच वाढत्या वाहनांमुळे शहरातील वायूप्रदूषण वाढत असताना आता सातत्याने पेटवण्यात येणाऱ्या कचऱ्यातून निघणाऱ्या धुरामुळे हवेच्या गुणवत्तेत मोठी घट होत असून, प्रदूषणाची पातळी चिंताजनक बनली आहे. त्यामुळे महापालिकेने कचरा पेटवणाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# २० नेते निवडणूक आयोगाच्या रडारवर!; प्रचार काळातील आमिष दाखवणारी वक्तव्ये भोवणार

**● मुंबई, सचिन कदम :**

नगरपालिका व नगरपंचायत निवडणुकीत मतदारांना आकर्षित करणारी वक्तव्य महायुतीतील बड्या नेत्यांना भोवण्याची शक्यता आहे. तिजोरीच्या चाव्या आपल्याकडे असे विधान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सभेत केले होते. तर मटण खा कोणचेही बटणं दाबा कमळच असे वक्तव्य भाजपच्या नेत्या चित्रा वाघ यांनी तर नगर विकास आपल्याकडे नगर विकास विभागात 'माला'ची कमतरता नाही, मतदानाच्या आदल्या दिवशी पहाटे पहाटे लक्ष्मी दर्शन होईल, असे वक्तव्य मंत्री गुलाबराव पाटील यांनी केले होते. प्रचार काळात २० नेत्यांनी अशा प्रकारची वक्तव्ये केली असून यात आचार संहितेचे उल्लंघन झाले आहे का, याचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडून मागवल्याचे राज्य निवडणूक आयोगातील वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.




राज्यात नगरपालिका व नगरपंचायत निवडणुकीची रणधुमाळी सुरु असताना महायुतीतील प्रमुख नेत्यांची राज्यभरात सभा पार पडल्या. यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री गुलाबराव पाटील, मंत्री संजय शिरसाट, भाजपच्या नेत्या चित्रा वाघ अशा बड्या नेत्यांनी सभाचा सपाटाच लावला होता. नगरपालिका व नगरपंचायत निवडणुकीत आपल्या पक्षाच्या अधिकाधिक जागा निवडून याव्यात यासाठी महायुतीतील प्रमुख नेत्यांसह मंत्र्यांनी ही सभेच्या माध्यमातून आपल्या पक्षाला मतदान करा, अशी साद घातली. मात्र याच वेळी मतदारांना प्रलोभने दाखवणारी वक्तव्ये एकनाथ शिंदे, अजित पवार, संजय शिरसाट, गुलाबराव पाटील, चित्रा वाघ अशा २० हून अधिक नेत्यांनी केली. या प्रमुख नेत्यांची वक्तव्ये आचार संहितेचे उल्लंघन करणारी आहेत का, याची चौकशी करण्यात येणार आहेत. यासाठी संबंधित जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांकडून अहवाल मागवला आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील निर्णय घेण्यात येईल, असे राज्य निवडणूक आयोगातील वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

राज्यात नगरपरिषद आणि नगर पंचायत निवडणुकीची रणधुमाळी चांगलीच तापली असताना महायुतीतील मित्रपक्षांतच संघर्षाचे स्फोटक वातावरण निर्माण झाले आहे. प्रचारसभांमध्ये एकमेकांवर कुरघोड्या आणि टीकाटिप्पणी करण्याची स्पर्धा सुरू असताना, वादग्रस्त वक्तव्यांमुळे आता निवडणूक आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री गुलाबराव पाटील, संजय शिरसाट, आमदार चित्रा वाघ यांच्यासह एकूण २० जणांच्या भाषणांची निवडणूक आयोगाकडून तपासणी होणार आहे.

**कॅमेऱ्याच्या आधारावर तपासणी!**

ज्या ज्या ठिकाणी नेत्यांच्या सभा असतात त्या त्या ठिकाणी निवडणूक आयोगाचे अधिकारी आणि कॅमेरे असतात. त्याच्या आधारे आता तपास केला जाणार आहे. २० नेते ज्यांच्या वक्तव्यांची दखल निवडणूक आयोगाने घेतली आहे.